# सोमनाथच्या कुटुंबीयांनी नाकारली शासकीय मदत

■ **वृत्तसंस्था, परभणी, दि. ८ :**

परभणी हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशी याचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला होता. पोलिसांच्या मारहाणीमुळे त्याचा मृत्यू झाल्याचे पोस्टमार्टेम रिपोर्टमधून समोर आले होते.

शासनाकडून सोमनाथ सूर्यवंशी याच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची मदत जाहीर झाली. परंतु, कुटुंबीयांनी ही मदत घेण्यास नकार दिला. तसेच सोमनाथला जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत शासकीय मदत स्वीकारणार नसल्याची भूमिका घेतली आहे. तलाठी आणि मंडळ अधिकारी १० लाखांच्या मदतीचा चेक घेऊन सूर्यवंशी कुटुंबीयांच्या घरी गेले होते. मात्र, सोमनाथच्या कुटुंबीयांनी ही मदत घेण्यास नकार दिला.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
दोन्ही घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष १५ * अंक १९७ * * गोंदिया * | गुरुवार, दिनांक ९ जानेवारी २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्राग्रलेख

खरीखरी..

## देवेंद्रजी सातकलमे

महाराष्ट्राचे तरुण तडफदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल महाराष्ट्राच्या अधिकाऱ्यांसाठी जो सात कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे. तो सर्वसामान्य जनतेच्या समस्यांना उत्तर देणारा आहे. सामान्य नागरिकांचे जीवन बाधारहित व्हावे. जनतेच्या सर्व समस्या शक्यतोवर वरपर्यंत येऊ नयेत. त्या खालच्या खाली सुटाव्यात. हे धोरण आणि त्यानिमित्ताने जनतेला देण्यात येणारी सुविधा निश्चितच सर्वसामान्यांसाठी दिलासा देणारी आहे. जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्रजी यांनी जी सात कलमे नमूद केली. ती सामान्य वाटत असली. तरी त्याचे महत्त्व निश्चितच मोठे आहे. माहितीच्या अधिकाराच्या कायद्यानुसार वारंवार जी माहिती मागितली जाते. ती संकेत स्थळावर उपलब्ध करून दिल्यामुळे उठसूट माहिती अधिकाराचा उपयोग करणाऱ्यांना चाप बसेल. तसेच सरकारी अधिकाऱ्यांचाही वेळ वाचेल. दुसरी बाब अत्यंत सामान्य पण तितकीच महत्त्वाची आहे ती म्हणजे, सरकारी कार्यालयात जनता येते पण तिथे त्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही. आता त्याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे, असे मुख्यमंत्री म्हणतात. ही बाब छोटीशी वाटते, पण भर उन्हाळ्यात पाणी-पाणी करत आपले काम करून घेण्यासाठी शासकीय कार्यालयात येणारे जे तहानलेले नागरिक असतात. ते या सरकारी पाण्याने तृप्त होतील, यात शंकाच नाही. सरकारी अधिकारी जे कोणी बनतात ते निश्चितच हुशार असतात. हुशार असल्याशिवाय कोणीही ऐरागैरा सरकारी अधिकारी होऊ शकत नाही. हे केवळ बोलण्यासाठी आम्ही बोलत नाही. काही अपवाद वगळता निश्चितच बरेच अधिकारी अत्यंत कार्यक्षम असतात. अशा कार्यक्षम अधिकाऱ्यांना आपल्या कार्यालयात किमान दोन सुधारणा करून नवे उपक्रम राबविण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी दिलेला आदेश निश्चितच अभिनंदनास पात्र आहे. यापुढे महत्त्वाची बाब अशी की, सामान्य नागरिकांना आपले काम करून देण्यासाठी किंवा समस्या ऐकण्यासाठी अधिकारी कधी उपलब्ध होतील, हे समजत नसते. साहेब कधी दौऱ्यावर असतात. साहेब कधी मीटिंगमध्ये असतात किंवा ते अतिशय महत्त्वाच्या कामात दंग असतात. आता अधिकारी नागरिकांसाठी नेमके कधी उपलब्ध होतील, याचा फलक लावण्यात येणार आहे. म्हणजे आता जबाबदारी असलेल्या या सर्व अधिका?यांना लोकाभिमुख व्हावेच लागेल. अधिकारी ज्या जिल्ह्यात आहेत. तेथील महत्त्वाचे कार्यक्रम, प्रकल्प आणि सर्व कार्यक्रमाबाबत तालुका व गावच्या पातळीवर जनसंपर्क करणे, अधिकाऱ्यांसाठी आता बंधनकारक होणार आहे. त्यामुळे सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्थानिक पातळीवर जे जे प्रश्न सुटू शकतात. त्या त्या समस्या तालुका आणि जिल्हा पातळीवरच सोडवल्या पाहिजेत. चिल्लर-चिल्लर कामांसाठी मंत्रालयात सध्या ज्या पद्धतीने लोकगंगा वाहत असते. ती कसेही करून कमी केली पाहिजे, असे त्यांना म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्रजींना वाटते. आता शेवटचे सातवे कलम शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत बाबींवर लक्ष केंद्रित करणारे आहे. आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आरोग्य केंद्र, अंगणवाडी आणि शाळा यांना भेटी दिल्या पाहिजेत. या भेटीत त्यांची सरबराई न करता संबंधितांचे म्हणजेच गरजूंचे प्रश्न सुटले पाहिजेत, असे या क्षणी नमूद करावे असे आम्हाला वाटते. सरकारी कार्यालये आता बरीच सुधारलेली आहेत. पण शासकीय कार्यालयाची स्वच्छता म्हणजे अनावश्यक कागदपत्रांचे ढिगारे, वापरात नसलेली बिनकामाची वाहने काढून टाकावीत. घाणेरडी प्रसाधनगृहे राहू नयेत. यासाठी अधिका?यांनी लक्ष घालावे. लोकशाही दिन लोकशाहीत दीन होऊ नये. म्हणून त्याकडे लक्ष असावे. या सर्व स्वप्नवत वाटणाऱ्या सुधारणा अधिका?यांनी केल्या पाहिजेत. यापैकी किमान 50% जरी सुधारणा झाल्या तरी आपला सुंदर देश, आपला पवित्र देश, आपला महाराष्ट्र देश निश्चितच गगनभेदी सुधारणांचा मेरुमणी ठरेल, यात शंका नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्या तळमळीने हा कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे सोपवला आहे. त्या सवार्चा विचार करून आपले अधिकारी पूर्णपणे आपल्या अधिकाराचा वापर करतील. असा आम्हाला आत्मविश्वास वाटतो आहे. असे म्हणतात, 'राजा कालस्य कारणम्' आपला हा राजा प्रजेसाठी सुखकर होवो, हीच आमची मनीषा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याबाबतचा

# शासन आदेश जारी

■ **महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :**

मराठी भाषेला अखेर अभिजात भाषेचा दर्जा जाहीर करण्यात आल्यानंतर याबाबतचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी मराठी भाषेला अभिजात दर्जा देणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, शासन आदेश न काढल्याने विरोधकांनी जोरदार टीका केली होती. आज केंद्रीय सांस्कृतिक मंत्री शेखावत यांनी यासंदर्भातला शासन आदेश जारी केला आहे. याबाबत मंत्री उदय सामंत यांनी माहिती दिली.

११ कोटी लोकांची बोलीभाषा असणारी मराठी ही जगातील १० व्या ते १५ व्या क्रमांकाची भाषा आहे. याशिवाय देशातील ती एक महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे.

तिच्या ऐतिहासिक प्रवासाचे संदर्भ देत आणि विविध शतकांमध्ये विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाचा विचार करून तिचे अभिजातपण स्वयंसिद्ध आहे, असेही या अहवालात नमूद करण्यात आले होते. त्यानुसार केंद्राने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणारी अधिसुचना काढली आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. या निर्णयाने जगभरात पसरलेल्या मराठीजनांना अभिमान वाटला असणार. मराठी भाषेसोबतच पाली, प्राकृत, आसामी व बंगाली या भाषांना देखील अभिजात दर्जा देण्यात आला आहे.

एखाद्या भाषेला अभिजात दर्जा मिळणे म्हणजे भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहोर उमटणे. भाषा आणखी समृद्ध करण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे २५० ते ३०० कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते. भाषा भवन उभारणे, भाषेतील ग्रंथ व साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथलये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा इतर संस्थांमार्फत भाषेचा प्रसार देखील यातून करता येतो.

विशेष म्हणजे भारतातील सर्व विद्यापीठांमध्ये मराठी शिकण्यासाठी व्यवस्था केली जाणार असून, प्राचीन ग्रंथांचा अनुवाद केला जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



### १९६५ मध्ये मिळाला राजभाषेचा दर्जा

भारतीय राज्यघटनेतील २२ अधिकृत भाषांच्या यादीत मराठीचा समावेश आहे. महाराष्ट्राची मायबोली मराठी असल्याने महाराष्ट्र दिनानिमित्त 'मराठी राजभाषा दिन' अर्थात 'मराठी भाषा दिन' १ मे रोजी साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय वसंतराव नाईक सरकारने घेतला होता. या सरकारने 'मराठी राजभाषा अधिनियम १९६४' हा कायदा ११ जानेवारी १९६५ रोजी प्रसिद्ध केला. या अधिनियमानुसार, महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल असे जाहीर करण्यात आले. १९६६ पासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली. मराठीला राजभाषेचा दर्जा देऊन वसंतराव नाईक सरकारने एकप्रकारे मराठीचा ऐतिहासिक गौरव केला.

## रस्ते अपघातातील जखमींवर
# कॅशलेस उपचार

■ **महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :**



रस्ते अपघातग्रस्तांना मार्चपासून कॅशलेस उपचार मिळणार आहेत. केंद्र सरकार यासाठी सुधारित योजना आणणार आहे. यात अपघाताच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत जखमी कमाल १.५ लाख रुपयांच्या उपचारांसाठी पात्र असेल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ही माहिती दिली.

ही योजना रस्त्यावरील कोणत्याही वाहनांच्या अपघातांसाठी लागू असेल. गेल्या वर्षी १४ मार्च रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने चंदीगडमध्ये रस्ता अपघातग्रस्तांना कॅशलेस उपचार देण्यासाठी एक पथदर्शी प्रकल्प सुरू केला होता. नंतर सहा राज्यांमध्ये त्याचा विस्तार झाला. तसेच वैमानिकांच्या धर्तीवर व्यावसायिक वाहनांच्या चालकांसाठीही कामाचे तास निश्चितीचे धोरण तयार करण्यासाठी सरकार कामगार कायद्यांचा अभ्यास करत आहे. यासोबतच मंत्रालयाने देशभरात ड्रायव्हिंग ट्रेनिंग पॉलिसी सुरू केली आहे, अशी माहिती गडकरी यांनी दिली.

## गुन्हेगारांना माफी नाही
### सीएम फडणवीसांचा पुनरूच्चार

■ **महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :**



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना सोडणार नाही. त्यांना काठोरातील कठोर शिक्षा करण्यात येईल ज्यामुळे गुन्हेगारांना एक संदेश मिळेल, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय देशमुख यांना दिला आहे.

संतोष देशमुख प्रकरणात जे कोणी गुन्हेगार असतील त्यांना माफी नाही. यामागे कुणीही असेल त्याला शिक्षा मिळेल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिला आहे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी देवेंद्र फडणवीस यांची आज मुंबईत जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत भाजपचे आमदार सुरेश धस उपस्थित होते.

### नागपूर, शिर्डी विमानतळांची कामे गतीने करा

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह नागपूर, शिर्डी येथील साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळांची कामे दिलेल्या मुदतीत गतीने पूर्ण करावीत, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित राज्यातील सर्व विमानतळांच्या बांधकामाच्या प्रगतीसंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते. फडणवीस म्हणाले की, सोलापूर व कोल्हापूर येथे नाईट लँडिंग होईल, असे नियोजन करावे. शिर्डी नाईट लँडिंग सुविधा लगेच सुरू करावी. नागपूर व शिर्डी विमानतळाचे अडलेले प्रश्न ३१ मार्चपर्यंत सोडवावेत.

## दोन जहाल महिला नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

■ **महासागर प्रतिनिधी,गडचिरोली, दि.८ :**

बुधवार ८ जानेवारीला दोन जहाल महिला नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. कंपनी क्र. १० ची सेक्शन कमांडर शामला झुरु पुडो उर्फ लीला (३६,रा. गट्टेपल्ली ता. एटापल्ली) व भामरागड दलम सदस्य काजल मंगरु वड्डे उर्फ लिम्मी (२४,रा. नेलगुंडा) अशी त्यांची नावे आहेत.

या दोघींवर मिळून तब्बल ५३ गुन्हे नोंद असून दहा लाखांचे बक्षीस होते. १ जानेवारीला ११ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर आता आणखी दोन महिला नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. शामला पुडोवर महाराष्ट्र सरकारचे ८ लाखांचे तर काजल वड्डेवर दोन लाखांचे बक्षीस होते.

आत्मसमर्पणानंतर केंद्र व राज्य सरकारकडून या दोघींना पुनर्वसनासाठी अनुक्रमे साडेपाच लाख व साडेचार लाख रुपये असे बक्षीस मिळणार आहे. २०२२ पासून आतापर्यंत एकूण ४६ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले.



शामला पुडो ही रुपेश मडावी ऊर्फ सांबा याची पत्नी आहे. या दोघींचा अनेक गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## खंडणी प्रकरणी पवारांची चिंता

■ **महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ८ :**



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची खंडणी प्रकरणातून हत्या झाल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणावरून शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोनवर संवाद साधल्याची आहे.

पवार यांनी राज्यातील पवनचक्की मालकांना खंडणीसंबंधी होणाऱ्या त्रासावर माहिती दिली. या समस्येचे तातडीने समाधान करण्याची मागणी फडणवीस यांच्याकडे केली आहे. राज्यात वारंवार होणाऱ्या खंडणीच्या प्रकारांवर चिंता व्यक्त करीत पवार यांनी राज्याच्या अनेक जिल्ह्यात खंडणीचे प्रकार वाढल्याचा उल्लेख केला.

## एचएमपीव्ही विषाणूचा ९ वा रुग्ण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ८ :**



महाराष्ट्रात बुधवारी कोरोना सदृश एचएमपीव्ही विषाणूचा तिसरा रुग्ण आढळून आला.

पवई येथील हिरानंदानी रुग्णालयात ६ महिन्यांच्या मुलीला संसर्ग झाल्याचे आढळून आले. मुलीला १ जानेवारी रोजी गंभीर खोकला, छातीत जडपणा आणि ऑक्सिजनची पातळी ८४% पर्यंत घसरल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तथापि, चिमुकली आता बरी झाली आहे. देशातील एकूण रुग्णांची संख्या ९ वर पोहोचली आहे.

## खाणीतून एक मृतदेह बाहेर

■ **वृत्तसंस्था, दिमा हासाओ, दि. ८ :**

आसाममधील दिमा हासाओ जिल्ह्यातील उमरंगसो येथे ३०० फूट खोल कोळसा खाणीत अडकलेल्या नऊ कामगारांपैकी एकाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. ८ अजूनही अडकले आहेत. कामगार खाणीतून कोळसा काढत असताना हा अपघात झाला होता. कामगारांच्या सुटकेसाठी लष्कर तैनात करण्यात आले आहे.

बचावकार्यात एनडीआरएफ आणि एसडीआरएफ टीमही मदत करत आहेत. भारतीय लष्कर आणि आसाम रायफल्सचे पाणबुडे आणि वैद्यकीय पथकांसह अभियंता टास्क फोर्स बचावकार्यात सामील झाले आहेत.

## जालंधरची हरसीरत बनली
# ज्युनियर मिस इंडिया



■ **वृत्तसंस्था, जालंधर, दि. ८ :**

जालंधर येथील हरसीरत कौर ही इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी ज्युनियर मिस इंडिया म्हणून निवडली गेली आहे. या स्पर्धेत ८ ते १० वर्षे वयोगटातील मुलांनी सहभाग घेतला. हरसीरत कौर विजयी झाली आणि तिने यावर्षी ज्युनियर मिस इंडियाचा किताब जिंकला.

हरसीरत कौर शहरातील एका खाजगी शाळेत शिकते. यासोबतच या स्पर्धेत गुजरातची प्रियांशा चहांदे दुसरी, तर सुंदरगडची सनम कराली तिसरी आली. या स्पर्धेत भारतभरातून सुमारे १२० मुलांनी सहभाग घेतला होता. हरसिरतने ८ ते १० वयोगटात विजेतेपद पटकावले आहे.

मुलीचे वडील गुर इकबाल आणि आई नीलू यांनी सांगितले, हरसिरतने इथपर्यंतचा प्रवास अजिबात सोपा नव्हता.






# 'टोरेस'चा गुंतवणूकदारांना गंडा

## संचालकासह 5 जणांविरुद्ध गुन्हा, कंपनीच्या ऑफिसवर दगडफेक

**मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

गुंतवणुकीवर दर आठवड्याला १० टक्के परतावा देण्याच्या प्रलोभनाने गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये घेऊन टोरेस कंपनीचे संचालक, व्यवस्थापक यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी गाशा गुंडाळल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर, सोमवारी शेकडो गुंतवणूकदारांनी कंपनीच्या मुंबईतील दादर, नवी मुंबईतील तुर्भे आणि मीरा-भाईंदर कार्यालयाबाहेर गर्दी केली. तुर्भेत संतप्त गुंतवणूकदारांनी कंपनीच्या कार्यालयावर दगडफेकही केली.

कंपनीच्या दादर कार्यालयात टोरेस ब्रँड चालविणाऱ्या प्लॅटिनम हर्न कंपनीसह त्याचे संचालक सर्वेश अशोक सुर्वे यांच्यासह पाच जणांविरुद्ध १३ कोटी रुपयांच्या अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाजी विक्रेते प्रदीपकुमार मामराज वैश्य (३१) यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे समजते.

दादर येथील जे.के. सावंत मार्गावरील टोरेस वास्तू सेंटर इमारतीबाहेर सोमवारी शेकडो गुंतवणूकदारांनी धडक दिली. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

शिवाजी पार्क पोलिसांनी हस्तक्षेप करीत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. कंपनीच्या




तुर्भेतील कार्यालयाबाहेरही गुंतवणूकदारांच्या संतप्त जमावाने दगडफेक केल्याने तणाव निर्माण झाला होता, परंतु पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

**प्रलोभन दाखवून १३ कोटी कसे हडपले?**

टोरेस कंपनीच्या संचालकांनी २१ ते ३० डिसेंबर २०२४ दरम्यान गुंतवणूकदारांची फसवणूक केली. या कालावधीत प्लॅटिनम हर्न प्रा. लि. ही कंपनी आणि कंपनीचे संचालक सर्वेश अशोक सुर्वे, व्हिक्टोरिया कोवालेन्को, सीईओ तौफिक रियाझ उर्फ जॉन कारटर, तसेच कंपनीच्या जनरल मॅनेजर तानिया कॅसातोवा आणि कंपनीची स्टोअर इन्चार्ज व्हॅलेंटीना कुमार यांनी मोजोनाईट हा खडा खरेदी केल्यावर त्यावर गुंतविलेल्या रकमेवर आठवड्याला १० टक्के परतावा देण्याचे प्रलोभन दाखविले. त्याला बळी पडून गुंतवणूकदारांनी १३ कोटी ४८ लाख १५ हजार रुपये गुंतविले, असे पोलिस तक्रारीत म्हटले आहे.

**साखळी अशी वाढत गेली...**

गुंतवणूकदार आणल्यास १० ते २० टक्के कमिशन मिळत असल्याने, गुंतवणूकदारांची साखळी वाढत गेली. अनेकांनी नातेवाईक, मित्रमंडळींना यात गुंतवणूक करण्यास भाग पाडले. गुंतवणूकदारांना फोनसह इतर महागड्या वस्तू भेट देऊन भुलविण्यात आले, असे सांगण्यात येते.

**कंपनीने विकलेले सोने खरे की खोटे?**

तुर्भे येथील कार्यालयात कंपनीने विक्रीसाठी सोनेही ठेवले होते. कंपनीने गुंतवणूकदारांना सोनेही विकले. ते खरे की खोटे, असा प्रश्न आता गुंतवणूकदारांना पडला आहे.

मुंबई पोलिसांनी कंपनीच्या दादर शाखेवर कारवाई केल्याची माहिती मिळताच, गुंतवणूकदारांनी तुर्भे कार्यालयाबाहेर मोठी गर्दी केली. एपीएमसी पोलिसांनी जमावाला पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणली. फसवणूकप्रकरणी एपीएमसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्रीपर्यंत सुरू होती.

## विहिगाव खोडाळ राज्य मार्गावर अपघात; एक मयत तर आठ जखमी



**कसारा, दि. ८ : प्रतिनिधी**

कसारा जवळील विहिगाव खोडाळा मार्गावरील अप्पर वैतरणा धरणावरील पुलाजवळ एक प्रवासी जीप 200 फूट खाली दरीत कोसळली. या अपघातात एक वयोवृद्ध व्यक्ती उपचारादरम्यान मयत झाली तर आठजण जखमी झाले आहेत. जखमींपैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी खर्डी येथे पाठवण्यात आले आहे.

मंगळवार (दि.7) सकाळी कसारा जवळील माळ येथील झुगरे कुटुंबीय एका खासगी वाहनातून माळ या गावातून खोडाळा येथे घरगुती कामासाठी निघाले असता विहिगाव सोडल्यानंतर एका वळणावर वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहनचालकाने डाव्या बाजूकडील एका दरीच्या दिशेने वाहन फिरवले मात्र अचूक अंदाज न आल्याने वाहन क्षणार्धात खोल दरीत कोसळली.

पलटी मारत जीप खाली असलेल्या धरण पात्राच्या पाण्याजवळील एका खडकावर जाऊन आदळली. या भीषण अपघातात आठ जण गंभीर जखमी झाले. जखमींना कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. जखमींपैकी दादू झुगरे (वय 65) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर अन्य जखमींवर कसारा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी पल्लवी आखाडे यांच्या प्रथोमचारानंतर पुढील उपचारासाठी खर्डी, इगतपुरी येथे पाठवण्यात आले आहे.

**जखमींची नावे अशी**

सन्या झुगरे (वय 60), भारती झुगरे (वय 18) , सुरेश ठोंबरे (वय 30), उषा झुगरे (वय 30), अती झुगरे (वय 38), अंकिता झुगरे (वय 16), आदित्य झुगरे (वय 08), पातळी झुगरे (वय 45) यापैकी दोघे अत्यवस्थेत आहेत.

अपघाताची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन विभागाचे विहिगावचे सदस्य देविदास आगिवले, किरण निरगुडे, गणेश वाघ, देवा वाघ यांनी धरणावरील पुलावर असलेल्या विहिगाव, कारेगाव येथील ग्रामस्थांच्या मदतीने जखमींना दरीतून बाहेर काढून एका खासगी वाहनातून कसारा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. आपत्ती व्यवस्थान विभागाच्या सदस्यांनी जखमींना मदत करीत रुग्णाल्यात दाखल केले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच शहापूर उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे, तहसीलदार परमेश्वर कासुळे, नायब तहसीलदार चौधरी, कसारा पोलीस ठाण्याचे प्रभारी सुरेश गावित, मंडळ अधिकारी तलाठी व पोलिसांचा मोठा लवाजमा मदतीसाठी घटनास्थळी दाखल झाला. प्रसंगावधान राखीत आपत्ती व्यवस्थापन टीम सदस्य व अन्य ग्रामस्थांच्या मदतीबद्दल प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापनचे शाम धुमाळ व सर्व सदस्याचे स्थानिक लोकांचे आभार मानले.

**अन्यथा मोठा अनर्थ**

दरम्यान आपघात ग्रस्तवाहन महाकाय जलाशयाच्या किनाऱ्यावर अडकल्याने पुढील मोठा अनर्थ टळला. अपघातग्रस्त वाहन ज्यावेळी दरीत कोसळल्यानंतर पाच फूट आणखी खोल गेले असते तर वाहनासह सर्व निष्पापांना जलसमाधी मिळाली असती. मात्र दैव बलवत्तर असल्याने सगळे थोडक्यात बचावले.

## डोंबिवलीत वडिलांकडून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**डोंबिवली, दि. ८ : प्रतिनिधी**

काही दिवसापूर्वी डोंबिवलीत एका वडिलाने आपल्या मुलीचा विनयभंग केल्याची घटना ताजी असतानाच, आता अन्य एका घटनेत वडिलांनी आपल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना रविवारी डोंबिवलीत घडली आहे.मुलीने वडिलांच्या कृत्याला विरोध केला म्हणून तिची शाळेची पुस्तके, कपडे वडिलांनी रागाच्या भरात जाळून टाकले आहेत. घरात घडलेला हा प्रकार मुलीने आपल्या आईला सांगितला. पत्नीने पतीला घडल्या प्रकाराबद्दल जाब विचारला. त्यावेळी पतीने पत्नीसह मुलींना चापटीने मारहाण केली. गेल्या सात दिवसाच्या कालावधीत दोन वेळा वडिलांनी आपल्या मुलीचा विनयभंग केला आहे. मानपाडा पोलीस ठाण्यात पीडित मुलीच्या आईने पती विरुध्द तक्रार केली. पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याने वडिलांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. मुलीच्या आईने पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की रविवारी संध्याकाळच्या वेळेत मुलगी घरात एकटी होती. यावेळी वडिलांनी पीडित मुलीचा विनयभंग करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तिने या सगळ्या प्रकाराला कडाडून विरोध केला. घडल्या प्रकाराने मुलगी घाबरली. तिने आई आल्यानंतर तिला वडिलांकडून झालेला प्रकार सांगितला. त्यावेळी पीडित मुलीचे आई, वडिलांमध्ये याविषयावर वाद झाला. या वादाच्यावेळी संतप्त झालेल्या वडिलांनी पत्नीला व पीडित मुलीला चापटीने मारहाण केली. या मुलीने घडला प्रकार घरात सांगितला म्हणून तिची घरातील शाळेची पुस्तके आणि तिचे कपडे कपाटातून काढून ते जाळून टाकले. मानपाडा पोलीस ठाण्याच्या साहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती जगताप याप्रकरणाचा तपास करत आहेत.

## पैशांच्या पावसासाठी 36 लाखांची फसवणूक

**सातारा, दि. ८ : प्रतिनिधी**

हवेतून पैशांचा पाऊस पाडून त्याचे ३६ कोटी रुपये करून देतो, अशी बतावणी करून दोन भोंदूबाबांनी पाच जणांना ३६ लाख रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याबाबत म्हसवड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल होताच पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक सखाराम बिरासदार यांनी दिली. कांता वामन बनसोडे (रा. देवापूर, ता. माण) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. या दोघांनी दैवी शक्ती व जादूटोण्याद्वारे पैशांचा पाऊस पाडून २० पट रक्कम करून देतो, असे सांगत त्यांच्यासह पाच जणांना ३६ लाख रुपयांचा गंडा घातला. फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यावर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक सखाराम बिरासदार करत आहेत.

## नवी मुंबई विमानतळ: 10 किमी परिघात प्राणी कत्तल, कचरा आणि घातक पदार्थ टाकण्यास मनाई

**नवी मुंबई, दि. ८ : प्रतिनिधी**

कोणत्याही परिस्थितीत एप्रिलपासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमानोड्डाण करण्याचा संकल्प सिडको आणि विकासक अदानी एअरपोर्ट कंपनीने केलेला असतानाच, आता राज्याच्या नगरविकास विभागानेही 'एरोड्रोम पर्यावरण व्यवस्थापन समिती'ची स्थापना करून एक पाऊल पुढे टाकले आहे.

यानुसार विमानतळाच्या बिंदूपासून १० किमीच्या परिघात प्राण्यांची कत्तल करणे, त्यांची कातडी वा अवशेष टाकणे, कचरा व इतर घातक पदार्थ टाकण्यास मनाई करण्यात येणार आहे. 'एरोड्रोम पर्यावरण व्यवस्थापन समितीच्या बैठका वेळोवेळी घेण्यात येणार आहेत.

**२० अधिकाऱ्यांचा समावेश**

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक या समितीचे अध्यक्ष राहणार असून, विभागीय कोकण आयुक्त, नवी मुंबई पालिका आणि पनवेल पालिका आयुक्त, नवी मुंबई पोलिस आयुक्त, राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त, रायगडचे जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, नागरी विमान वाहतुकीचे महासंचालक, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संचालक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय एअरलाइन कंपन्यांचे प्रतिनिधी, कोकण पाटबंधारे महामंडळाच्या संचालकांसह २० अधिकाऱ्यांचा एरोड्रोम समितीत समावेश आहे. विमानतळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे समितीचे सदस्य सचिव असल्याचे नगरविकास विभागाने ६ जानेवारीच्या निर्णयात म्हटले आहे.

## अग्निशमन देवदूतांकडून 24 नागरिकांना जीवदान

**भिवंडी, दि. ८ : प्रतिनिधी**

ठाण्यातील कापूरबावडी परिसरातील एका तळ अधिक सहा मजली इमारतीला भीषण आग लागल्याची घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली असून अग्निशमन देवदूतांनी प्रसंगवधान राखत आगीवर नियंत्रण मिळवून २४ नागरीकांचा जीव वाचवला आहे.दरम्यान नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडत अग्निशमन दलाच्या जवानांचे आभार व्यक्त केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार,रविवारी रात्री साडे दहा वाजताच्या सुमारास ठाण्यातील कापूरबावडी येथील छबय्या पार्क मधील ए - १ या तळ अधिक सहा मजली इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर अचानकपणे भीषण आग लागली.पाहता पाहता या आगीने रौद्ररूप धारण केले. तर या आगीच्या धुरामुळे नागरिकांना श्वसनास त्रास होत होता.त्यामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली होती.तर या आगीत तब्बल २४ नागरिक अडकले होते. दरम्यान याची माहिती इमारतीतील नागरिकांनी ठाणे अग्निशमन दलाला देताच बाळकुम अग्निशमन दल प्रमुख निलेश नारायण वेताळ,सहाय्यक केंद्र अधिकारी मनोज मारुती लोणे,चालक वाय.व्ही पाटील,दामोदर राऊत,फायरमन संदीप महाले,दीपक बोहाडे,रविंद्र पाटील,सागर केणे,शिवाजी मेंगाळ आदि टीमने ४ अग्निशमन दलाच्या गाड्या,१ टँकरसह १ उंच शिडीची गाडी घेऊन घटनास्थळी पोहचून दीड ते दोन तासांच्या अथक प्रयत्नांनी पहिल्या,चौथ्या,पाचव्या आणि सहाव्या मजल्यावर अडकलेल्या एकूण २४ नागरिकांची सुखरूप सुटका करण्यात आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले.या आगीचे कारण अस्पष्ट आहे.तर सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसून फक्त वित्तहानी झाली आहे. त्यामुळे अग्निशमन दलाच्या यशस्वी रेस्क्यू ऑपरेशन नंतर इमारतीतील आगीत अडकलेल्या नागरिकांनी अग्निशमन दलाचे आभार मानले आहेत.

## सेप्टिक टँकमधील जीवघेण्या गॅसमुळे एकाचा मृत्यू, एक गंभीर

**भाईंदर, दि. ८ : प्रतिनिधी**

भाईंदर पूर्वेकडील नक्षत्र या बहुमजली इमारतीतील सेप्टिक टँकची साफसफाईचे काम करण्यासाठी इमारतीतील सोसायटीने काशिमीरा नाक्यावरील चार कामगारांना आणले होते. त्या कामगारांनी सेप्टिक टँकचे झाकण उघडताच त्यातून बाहेर पडलेल्या गॅसमुळे ते दोघे कामगार त्या टँकमध्ये पडले. त्यातील एकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसरा अत्यवस्थ झाल्याने त्याला लगतच्या खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. मृत कामगाराचे नाव महेंद्र पौंडकर (37) असे असून अत्यवस्थ झालेल्या कामगाराचे नाव गणेश आवटे (40) असे आहे. हे दोघेही काशिमीरा परिसरात राहणारे आहेत. शहरातील सेप्टिक टँकची साफसफाई करण्यासाठी पालिकेने मानवाचा वापर न करता पालिकेच्या इंनोव्हेशन सेल ला संपर्क साधून मशीनद्वारे सेप्टिक टँकची साफसफाई करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यासाठी पालिकेकडून जनजागृती केली जात असतानाही भाईंदर पूर्वेकडील नक्षत्र इमारतीतील सोसायटीने सेप्टिक टँकच्या साफसाईचे काम चार नाका कामगारांना दिले. टँकची साफसफाई करण्यासाठी त्या कामगारांपैकी महेंद्रने टँकचे झाकण उघडले असता त्यातील गॅस वेगाने बाहेर पडला. त्यामुळे तो बेशुद्ध होऊन टँकमध्ये पडला. त्याला वाचविण्यासाठी गणेश टँकमध्ये उतरला असता तो देखील बेशुद्ध होऊन तील महेंद्रचा जागीच गुदमरून मृत्यू झाला तर गणेश हा अत्यवस्थ झाल्याचे लक्षात येताच टँकबाहेर उभे असलेल्या दोन कामगारांनी त्या टँकमध्ये पडलेल्या महेंद्र व गणेशला बाहेर काढले. त्यांना स्वच्छ करून तात्काळ लगतच्या खाजगी रूग्णालयात उपचारासाठी नेले. त्यातील महेंद्रचा मृत्यू झाल्याचे रूग्णालयातील डॉक्टरांकडून सांगण्यात आले तर गणेशची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्याला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात नोंदणी करण्यात आली असून घटनेचा तपास पोलिसांकडून सुरु करण्यात आला आहे. तर याप्रकरणी पालिका कोणती कार्यवाही करणार, हे पहावे लागणार आहे.


# लायन्स क्लब आणि पोलिसांची रस्ते सुरक्षेसाठी रॅली

**वसई, दि. ८ : प्रतिनिधी**

लायन्स इंटरनॅशनल, ग्रामीण सेवा सप्ताहच्या अंतर्गत वाहतूक आणि रस्ते सुरक्षेविषयी जागरूकतेसाठी, मीरा भायंदर आयुक्तालयाच्या वसई विरारच्या ट्रॅफिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने एका रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

धावपळीच्या जीवनशैलीमध्ये मोठ्या प्रमाणात अपघात होत आहे त्यातच चालकांचा निष्काळजीपणा व ट्रॅफिकचे नियम न पाळल्याने होणारे अपघातांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अपघातामुळे कुटुंब उद्ध्वस्त होतात व पोलीस खात्यावर, समाजावर पडणारा ताण वाढतो तो वेगळाच. या दृष्टीने विचार करून सामाजिक क्षेत्रामध्ये सेवेमध्ये अव्वल असणारी जागतिक लायन्स क्लब व मीरा-भाईंदर आयुक्तालयाच्या वसई विरार विभागाने संयुक्तरित्या एका जागरूकता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या यादीमध्ये अनेक संस्थांनी आपला सहभाग नोंदवला, यामध्ये एनएसएसचे स्टुडन्ट सदस्य राष्ट्रीय सैनिक संस्थेचे सदस्य व तसेच अनेक संस्थांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला.

ट्रफिकचे सिनियर पोलीस निरीक्षक महेश शेट्ये यांच्या विशेष सहयोगाने व डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन राहुल रस्तोगी, श्रद्धा मोरे, प्रीती सोढा, हनुमंत भोसले, भावेश धनेचा, भारती पवार, अतुल दांडेकर, नितीन पुरकर, निनाद म्हात्रे, शिल्पी रस्तोगी, दीपक बडगुजर, डॉ. सोमनाथ विभुते, सुनील लावटी, मानस विभुते यांनी विशेष मेहनत घेऊन ट्रॅफिक रॅलीचे यशस्वी




आयोजन केले. यात डिस्ट्रिक्ट गवर्नर लायन सरस्वती संकर, माजी प्रांतपाल लायन डॉ. प्रशांत पाटील व माजी प्रांतपाल लायन हेमंतराज सेठीया, प्रथम उप प्रांतपाल मनोज बाबूर, द्वितीय उप प्रांतपाल नटवर बांका, विकास सराफ, उर्वी रजिस्ट्रर, डॉ. प्रवीण छाजड, व अनेक लायन सदस्य सामील झाले होते.

ट्रॅफिकविषयी बोधवाक्य, घोषणाचे फलक घेऊन एन्नएसएस, एनसीसी, न्यू इंग्लिश स्कूलचे बँड पथक, सेंट जेम्स हायस्कूल, आगाशीचे लेझीम पथक, साई प्रेरणा वस्ती स्तर बचत गटाच्या महिला, विविध लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन शिवा डोंगरे, रंजना म्हात्रे, दयानंद मानकर, कल्पेश शाह, वर्षा मोदगेकर, नागर गहलोत यांनी रॅलीचा बॅनर घेऊन दीड किलोमीटरची वाटचाल केली. यात ट्रॅफिक पोलीस, अनेक लायन मेंबर्स सामील होते. राष्ट्रीय सैनिक संस्थेचे मुंबई प्रदेशचे पदाधिकारी यावेळी मार्गदर्शन करीत होते.

रॅलीची सांगता स्टेला पेट्रोल पंपच्या मागे, ड्रीम अरेना बँकवेट हॉल मध्ये झाली. तिथे ट्रॅफिक पोलिसांसाठी विनामूल्य आरोग्य तपासणीचे आयोजित केले होते. मेडिब्रेन सोशल फौंडेशन ह्या वैद्यकीय सेवा संस्थेने सुट्टीची परवा न करता दिवस रात्र नागरिकांच्या सुरक्षेसाठी ड्युटी करणाऱ्या पोलिसांची मोफत मधुमेह, पूर्ण नेत्र तपासणी, इसीजी, फुफ्फुस, रक्तदाब, जनरल तपासणी अशा विविध तपासण्या केल्या.

डीसीपी पूर्णिमा चौगुले यांनी त्यांच्या भाषणातून अनेक विषयाची माहिती दिली व उत्तम मार्गदर्शन केले. त्यांनी लायन्स क्लबचे अनेक कार्यामध्ये मदत होत असल्याबद्दल आभार मानले. माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दहिफळे व वसई पोलीस ठाण्याचे निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर मंचावर उपस्थित होते.

# आगरवाडी विद्यालयात पत्रकार दिन साजरा

## आमदार राजेंद्र गावित व आमदार विलास तरे यांच्या पत्रकारांना शुभेच्छा

**सफाळे, दि. ८ : प्रतिनिधी**




अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद पालघर जिल्हा शाखेच्या वतीने आगरवाडी येथील लोकनायक जयप्रकाश नारायण विद्यालय व अनंत जनार्दन वर्तक महाविद्यालय येथील स्वर्गीय डॉक्टर नेताजी यशवंत पाटील सभागृहात पत्रकार दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून प्राचार्य तानाजी लांडगे, प्रमुख अतिथी आमदार राजेंद्र गावित, आमदार विलास तरे, शिवसेना जिल्हाप्रमुख वसंत चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंदन संखे, प्रमुख वक्ते नीरज राऊत व मंगेश तावडे तसेच मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष विजय घरत, कोकण विभाग अधीस्वीकृत समिती सदस्य हर्षद पाटील, राज्य परिषद समन्वयक प्रमोद पाटील, सरचिटणीस सुमित पाटील तसेच पालघर जिल्ह्यातील पत्रकार व ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकेत विजय घरत यांनी आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या बद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. प्रमुख वक्ते नीरज राऊत यांनी पत्रकारिता करत असताना स्थानिक विषयांवर लेखन केले पाहिजे व त्यासाठी जास्तीत जास्त मराठी वाचण्यासाठी व लिहिण्यासाठी आताच्या नवीन पिढीने प्रयत्न केले पाहिजेत असे सांगितले. मंगेश तावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की, विद्यार्थ्यांनी शुद्ध वाचावे व शुद्ध लिहावे तसेच बातमी तयार करत असताना त्यामध्ये सर्व समावेशकता असायला हवी. शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख वसंत चव्हाण व कुंदन संखे यांनी सर्व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. आमदार राजेंद्र गावित व आमदार विलास तरे यांनी विधानसभा मतदारसंघात विजय संपादन केल्यानंतर पहिल्यांदाच कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवत विविध समस्यांना वाचा फोडणाऱ्या पत्रकारांचे कौतुक केले. यावर्षी उल्लेखनीय कामगिरी करणारे शशिकांत कासार यांना स्व. दिनेश यादव आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्युनिअर कॉलेजच्या सर्व विद्यार्थ्यांना मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पेन वाटण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार जतिन कदम यांनी केले तर सर्वांचे आभार सरचिटणीस सुमित पाटील यांनी मानले.

# महामार्गावरील विद्युत खांब हटविण्याची जबाबदारी एमएमआरडीएची

- अंबरनाथच्या महामार्गावरील खांब
- महावितरणकडून सातत्याने पाठपुरावा

**कल्याण, दि. ८ : प्रतिनिधी**

अंबरनाथ शहरातून जाणाऱ्या कल्याण ते बदलापूर महामार्गावरील विजेचे खांब स्थलांतरित करण्याची जबाबदारी एमएमआरडीएची (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) आहे. महामार्गाचे रुंदीकरण करतांना विजेचे खांब स्थलांतरित करण्यासाठी एमएमआरडीएने दिलेला प्रस्ताव १.३ टक्के डीडीएफ योजनेतून मंजूर करून महावितरणने मार्च २०२० मध्येच एमएमआरडीएला दिला. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील काम मात्र संथ गतीने सुरू आहे. दरम्यान अपघात टाळण्यासाठी अडथळा ठरणाऱ्या खांबांना रेडियमच्या पट्ट्या लावण्यात आल्याची माहिती महावितरणने दिली आहे. अंबरनाथ शहरातून जाणाऱ्या कल्याण-बदलापुर महामार्गाचे रुंदीकरण करताना विजेचे खांब स्थलांतरित करण्याबाबत एमएमआरडीएने प्रस्ताव दिला होता. या प्रस्तावाला महावितरणने मार्च आणि ऑगस्ट २०२० मध्ये १.३ टक्के डीडीएफ योजनेतून मंजुरी दिली. त्यानुसार रुंदिकरण करताना विजेचे खांब स्थलांतरीत करण्याचे काम एमएमआरडीएच्या कार्यकारी अभियंता (विदयुत) यांच्यावर आहे. महावितरणची जबाबदारी केवळ संबंधित कामावर देखरेख ठेवण्यापर्यंत मर्यादित आहे. पहिल्या टप्प्यातील वाहिन्या भूमिगत करण्याचे काम जानेवारी २०२२ मध्ये पूर्ण झाले. उर्वरित कामाच्या निविदा प्रक्रियेसाठी महावितरणने एमएमआरडीएकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यानुसार एमएमआरडीएने देखरेख शुल्काचा भरणा करून मे. टॉप ईलेक्ट्रीकल या कंत्राटदाराकडे काम सोपवले आहे. एमएमआरडीए, महावितरण आणि कंत्राटदाराकडून संयुक्त पाहणी करून कामास सुरूवात करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी होणारे अपघात टाळण्यासाठी तुर्तास अडथळा ठरणाऱ्या खांबांना रेडियमच्या पट्ट्या लावण्यात असल्या आहेत. खांब स्थलांतरित करण्याचे काम लवकर पूर्ण व्हावे, यासाठी महावितरण एमएमआरडीएच्या कंत्राटदारास संपूर्ण सहकार्य करत असल्याची माहिती महावितरणने दिली आहे.

महासागर
# गोंदिया
गुरूवार, ९ जानेवारी २०२५
पान ३

महासागर
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी
जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट, गांधी प्रतिमा चौक, गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

## अवैध व्यवसायाने तालुक्यात खळबळ

**प्रतिनिधी / सडक-अर्जुनी**

आदिवासी बहुल व अविकसित असलेला तालुका अवैध धंद्यांनी बहरला असून, त्याचा फटका शाळकरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बसत आहे. विद्यार्थी व्यसनाधीन बनत चालले आहेत. या प्रकाराला पोलिसांची मूक संमती असल्याचेही बोलले जाते. त्यातच जेव्हापासून गाव तंटामुक्त अभियानाची मोहिम थंडावली तेव्हापासून यात अधिकची भर पडत आहे.

तालुक्यात एकूण १०८ गावे असून, त्यापैकी चार गावे रीठी आहेत. त्यामध्ये सात ते आठ गावे देवरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येतात. तर दोन-तीन गावे गोरेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत येतात. उरलेली ८६ गावे आणि टोले पकडून १०० वर गावे डुग्गीपार पोलिस ठाण्याच्या हद्दीत येतात.

एवढ्या मोठ्या गावांचा कारभार सांभाळताना डुग्गीपार पोलिस ठाण्याचे नियंत्रण हवे असताना, या तालुक्यात सध्या सट्टापट्टीचा व्यवसाय जोरात बहरला असल्याचे नागरिक सांगतात. सट्टापट्टीचा व्यवसाय हा खुलेआम चालत असून, सट्टापट्टी लावणाऱ्या व घेणाऱ्यांना सध्या फारच सुगीचे दिवस आले असल्याचे बोलले जाते. नागरिकांना सट्टा लावण्यासाठी जास्त भटकण्याची गरज नाही. सट्टा कुठे लावला जातो, कोण-कोण सट्टापट्टी घेतात, हे चित्र पाहायला मिळत आहे. अवैध दारू विक्रीचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे बोलले जात आहे.

## दृष्टिक्षेप

### धामनेवाडा येथे शंकरपट २० जानेवारीपासून

**एकोडी** : जवळील धामनेवाडा येथील क्रिकेट मैदानावर भव्य शंकर पटचे आयोजन २० ते २२ जानेवारीपर्यंत करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार विजय रहांगडाले, आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. राजेंद्र जैन राहणार आहेत. आयोजित शंकर पटात प्रथम पुरस्कार ३१ हजार, द्वितीय २५ हजार, तृतीय २० हजार त्यानंतर अनुक्रमे १० नंबरपर्यंत पुरस्कार देण्यात येणार आहे. शंकर पट आयोजित समितीचे अध्यक्ष अनिलकुमार बिसेन, उपाध्यक्ष भोजराज बोपचे, सचिव रविंद्र भदाडे, पुरणलाल बोपचे तसेच समितीचे सदस्यांचा पुढाकाराने या शंकर पटाचे आयोजन करण्यात आले असून २० जानेवारी रोजी सकाळी १० वाजे सिरतसर उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथींसह जि.प.सदस्य अश्विनी पटले, सरपंच हिरामन मसराम, माजी जि.प.सदस्य रमेश अंबुले, पं.स. सदस्य अजाबराव रिनाईत, सुजाता पारधी, शंकपाल भगत, राजेश कटरे, पुरुषोत्तम भदाडे, संजय बावणकर, हितेश पताहे, सोनु घरडे, निरज रिनाईत, रिवकुमार पटले, सुरेश पटले आदी उपस्थित राहणार आहेत.

### पोलिस पाटलावर कुऱ्हाडीने हल्ला

**सालेकसा** : तालुक्यातील फुक्कीमेटा येथे पती-पत्नीचा सुरू असलेला वाद सोडविण्यासाठी गेलेल्या पोलिस पाटलावर आरोपीने कुऱ्हाडीने हल्ला करून जखमी केले. ही घटना ५ जानेवारीच्या रात्री ८ ते ८.३० वाजता सुमारासची आहे. तेजराम हरीराम येरपुडे रा.फुक्कीमेटा असे आरोपीचे नाव आहे. फियार्दी चंद्रकुमार श्रीकृष्ण हुकरे (४८) रा.फुक्कीमेटा हे पोलिस पाटील आहेत. ५ जानेवारी रोजी आरोपी तेजराम हरीराम येरपुडे हा आपल्या पत्नीसोबत भांडण करीत होता. यावर आरोपीची पत्नी इंदुबाई येरपुडे यांनी पोलिस पाटील चंद्रकुमार हुकरे यांना माहिती दिली. माहितीनुसार पोलिस पाटील हुकरे हे भांडण सोडविण्यासाठी दाखल झाले. यावर आरोपीने पोलीस पाटील यांना पाहून 'तु दरवेळेस माज्या घरगुती भांडणात मधात पडतोस, पहीले तुलेच कापुन जिवाने मारतो' असे म्हणत कुऱ्हाडीने हल्ला केला. या घटनेत पोलिस पाटील यांच्या डोक्याला जखम झाली आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून सालेकसा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील सेपानि मावसकर करीत आहेत.

### पं.स.सभापती पदाची आरक्षण सोडत १० जानेवारीला

**गोंदिया** : महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभागाची अधिसूचना दि.४ ऑक्टोबर २०२२ नुसार गोंदिया जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदाचे आरक्षण संख्या निश्चित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार पुढील अडीच वर्षाच्या कालावधीकरीता जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षीत पदांची सोडत १० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात काढण्यात येणार आहे. सदर सोडतीचे वेळी सर्व पंचायत समिती सदस्य व गोंदिया जिल्ह्यातील मान्यता प्राप्त राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी तसेच इच्छुक नागरिकांनी उपस्थित रहावे, असे जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# हायमास्ट लाईटचा खांब कोसळला, विद्यार्थी जखमी

**प्रतिनिधी / गोंदिया**

तालुक्यातील कामठा येथील क्रिडा संकूलात उभारण्यात आलेले सोलर हायमास्ट लाईटचे खांब कोसळला. दरम्यान मैदानात खेळ असलेला एक विद्यार्थी खांबाखाली आल्याने जखमी झाला. ही घटना (ता.७) दुपारी ३.३० ते ४ वाजता सुमारासची आहे. आर्यन महेंद्र मेंढे (१५) रा.छिपीया असे जखमी विद्यार्थ्याचे नाव आहे. जखमी विद्याथ्यार्ला खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेने विकासकामांची पोलखोल झाली आहे.

कामठा येथील क्रीडा संकूलात काही महिन्यांपूर्वीच सोलर हायमास्ट लाईलचे खांब उभारण्यात आले आहेत. या खांबावर सोलर प्लेट लावून कंत्राटदाराने काम फत्ते केले. (ता.७) दुपारी ३ ते ४ वाजता सुमारास मैदानात क्रीडा सराव करण्यासाठी खेळाडू व विद्यार्थी नेहमीप्रमाणे आले. जीईएस हायस्कूल येथे शिक्षण घेत असलेला विद्यार्थी आर्यन महेंद्र मेंढे (१५) हा खांबापासून काही अंतरावर सराव करीत होता. दरम्यान अचानक सोलरप्लेट लागलेला खांब कोसळला. याच्यात आर्यन सापडल्याने डोक्याला गंभीर दुखापत होवून तो जखमी झाला. या घटनेने क्रिडा संकूलात एकच धावपळ सुटली. दरम्यान उपस्थितांना





मदतकार्य करीत आर्यन मेंढे याला त्वरित रूग्णालयात हलविले. तर याची माहिती क्रीडा संकूल प्रशासनाला देण्यात आली. घटनेतील जखमी आर्यन मेंढे हा गोंदिया येथील खासगी रूग्णालयात उपचार घेत असून डॉक्टरांनी दोन ते अडीच लाखाचा खर्च सांगितला आहे. विद्यार्थ्यांचे पालकाची आर्थिक भुर्दंड पेलण्यास सक्षम नसल्याने चिंता निर्माण झाली आहे. यामुळे प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच उपचाराचा संपूर्ण खर्च विद्यार्थ्यांच्या पालकांना देण्यात यावा, अशी मागणी महेंद्र मेंढे यांच्यासह परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### निकृष्ट बांधकामाची पोलखोल

**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून तालुका क्रीडा संकूलामध्ये मोठा निधी खर्चून सौर हायमास्ट लाईट लावण्यात आले. याच्यासाठी मेटा नावाच्या एका एजंन्सीला कंत्राट देण्यात आले. या कंपनीचे दुसऱ्या कंत्राटदाराच्या माध्यमातून कामे करवून घेतली. दरम्यान कामाला ८ ते १० महिने लोटले असून आज उभारण्यात आलेला खांब कोसळून विद्यार्थी जखमी झाला. या घटनेमुळे निकृष्ट बांधकामाची पोलखोल झाली असून कोणत्या स्तरापर्यंत विकासकामे केली जात आहे, याचे पितळ उघडे पडले आहे. विशेष म्हणजे, कंत्राटदाराने फक्त दोन नट-बोल्ट उपयोगात आणून सौर हायमास्ट लाईटचे खांब उभारले होते.**

## ग्रामविकास अधिकाऱ्यांनी मानले जि.प. अध्यक्षांचे आभार

**प्रतिनिधी/ गोंदिया**

जिल्हा परिषद मार्फत अनुकंपा तत्वावर विविध ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविकास अधिकाऱ्यांची नियुक्तीचा मुद्दा मागील अनेक दिवसांपासून रखडला होता. दरम्यान जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी पारदर्शकता राखून अनुकंपा तत्तावर ग्रामविकास अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. दरम्यान रुजू झालेल्या अनुकंपाधारक कर्मचाऱ्यांनी जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले यांची भेट घेत त्यांचे आभार व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष रहागंडाले यांनी सर्व अनुकंपाधारक कर्मचाऱ्यांना त्यांच्या नव्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाई

### १० लाख २५ हजाराचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी / गोंदिया**

तिरोडा तालुक्यातील वैनगंगा नदी पात्रातून अवैधरित्या रेतीचा उपसा करून पोलिसांना तिरोडा-तुमसर मार्गावरील मौजा पाटीलटोला/घोगरा येथे रेतीची तस्करी करतांना मिळून आला.

आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करून २५ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाी ६ जानेवारी ३ वाजेच्या सुमारास करण्यात आली.

सविस्तर असे की, तिरोडा तालुक्यातील वैनगंगा नदीच्या घाटकुरोडा रेती घाटातून आरोपी विजय लक्ष्मण शेंद्रे (२९) रा. पालगाव ता.जि. भंडारा याने नदी पात्रातून अवैधरित्या रेतीचा उपसा करून टिप्पर क्र. एमएच.४०/ एके. ४५९७ ने विनापास परवाना रेतीची वाहतूक करीत होता. दरम्यान त्याला तिरोडा-तुमसर मार्गावरी पाटीलटोला/घोगरा येथे पोलिसांनी अडविले. दरम्यान त्याला रेती वाहतुकीचा परवाना विचारल्यावर आरोपीने उडवाउडवीचे उत्तर दिल्याने पोलिसांनी २५ हजार रुपये किंमतीची पाच ब्रास रेती व १० लाख रुपये किमतीचा टिप्पर असा एकूण १० लाख २५ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. फिर्यादीच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला.

## सी-६० पथकातील जवानाचा मृत्यू

**प्रतिनिधी / सालेकसा**

सालेकसा येथे कार्यरत सी-६० पथकातील जवानाचा अचानक प्रकृती बिघडून मृत्यू झाला. ही घटना ५ जानेवारीची आहे. नितेश दुधराम कोरे असे मृताचे नाव आहे. ३० एप्रिल २०२४ पासून तो सी-६० पथकात कार्यरत होता. विशेष म्हणजे, काही दिवसानंतर त्यांचा साक्षगंध होणार होते. अशातच नितेश कोरे यांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.



सडक अर्जुनी तालुक्यातील कनेरी येथील रहिवासी असलेले नितेश कोरे (२५) हे सालेकसा पोलिस स्टेशन येथे सी-६० पथकात कर्तव्यावर होते. नेहमीप्रमाणे कर्तव्य बजावत असताना ३ जानेवारी रोजी अचानक त्यांची प्रकृती खालावली. दरम्यान उपचाराकरीता गोंदिया येथील खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचाराकरीता नागपूर येथे रेफर करण्यात आले. उपचार सुरू असताना ५ जानेवारी रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच कनेरी गावशिवारात एकच शोककळा पसरली. ५ जानेवारीला रात्री उशिरापर्यत त्यांचे मृतदेह कनेरी गावात दाखल झाले. दरम्यान त्यांच्या पार्थिवावर स्थानिक मोक्षधामावर अंत्यसंस्कार करण्यात आला. विशेष म्हणजे, नितेश कोरे यांचा विवाह देवरी तालुक्यातील मरामजोब येथील एका युवतीसोबत विवाह जुळलेला होता. १० जानेवारी रोजी साक्षगंध कार्यक्रम आयोजित होता. त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## अत्याधुनिक सोयीसुविधा युक्त सिरेगावबांधची डिजीटल जि.प.प्राथ.शाळा

**प्रतिनिधी / अर्जुनी मोर**

केल्याने होत आहे रे,आधी केलेच पाहीजे मनात प्रचंड इच्छाशक्ती किंवा दृढनिश्चय असला की कोणतीही गोष्ट कठीण नसते.याचे प्रत्यंतर अर्जुनी मोर.तालुक्यातील सिरेगावबांध या गावात पहायला मिळते, सानगडी-नवेगांवबांध रोडवर काही अंतरावर असलेले सिरेगावबांध, या गावातील प्रवेशद्वारातुन प्रवेश केला की या स्मार्ट ग्रामची प्रचिती येते. संपुर्ण सिसिटिवीच्या निगरानीत हे गाव विवीध पुरस्कार प्राप्त आहे. अशा या स्मार्ट गावात शहरातील शाळांना हेवा वाटावा आणी जिल्ह्यातील शाळांनी सहलीच्या माध्यमातुन एकदा या शाळेला भेट द्यावी अशा अत्याधुनिक सोयीसुविधाने सिरेगावबांध ची डिजीटल जि.प.प्राथमिक शाळा सज्ज आहे.

अर्जुनी मोर. तालुक्यातील सिरेगावबांध ग्रामपंचायत माजी सरपंच व विद्यमान उपसरपंच इंजी. हेमकृष्ण संग्रामे यांचे कार्यकर्तृत्वाने विदर्भ, महाराष्ट्रासह देशात नावलौकिक प्राप्त आहे. विज, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य,

### चला एकदा या शाळेला भेट देवु या



रंगरंगोटी, सुंदर रस्ते, सुसज्ज नाल्या, ग्रामसफाई, अशा सुसज्ज व्यवस्थेने परिपूर्ण असलेल्या या गावात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सर्वबाबीने सुसज्ज आहे. जि.प.आदर्श डिजीटल वरिष्ठ प्राथमिक शाळा सिरेगावबांध येथे १ ते ८ पर्यंत वर्ग असुन पटसंख्या १०१ आहे. चार शिक्षक व चार स्वंयसेवक अध्यापनाचे काम करतात. शिक्षणाबरोबरच येथे संस्काराचे धडेही येथे दिल्या जाते. या शाळेत प्रत्येक वर्ग डिजीटल असुन प्रत्येक वर्गात टिव्ही ची व्यवस्था आहे. प्रत्येक वर्गात पंखे व शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था आहे. पावसाचे पाणी वॉटर हारवेस्टींग व फिल्टर करुन विहिरीत सोडले जाते. प्रशस्त क्रीडांगण, शौचालय, बाथरुमची स्वतंत्र व्यवस्था, ग्रंथालय, विज्ञानकक्ष, संगणक कक्ष, प्रशस्त ईमारत, रंगरंगोटी, सुसज्ज बागबगीचे व संपुर्ण शाळा सिसिटिव्ही च्या निगराणीखाली आहे. निसर्गाचे वरदहस्त असल्याप्रमाणे दिसणारा शालेय परिसर, सुंदर शाळेची ईमारत भेट देणाऱ्यांचे मन मोहुन टाकते. मुख्याध्यापक टि.के.ठवकर यांचे कार्यकर्तृत्वात सध्या अध्यापनाचे काम सुरु आहे. सिरेगांवबांध च्या विद्यमान सरपंच सागरताई चिमणकर यांचे कार्यकाळात माजी सरपंच व विद्यमान उपसरपंच इंजी. हेमकृष्ण संग्रामे यांचे कुशल नेतृत्वातुन सिरेगावबांध ग्रामपंचायत यशाच्या प्रचंड शिखरावर झेप घेत आहे. चला तर मग एकदा सिरेगावबांध ला भेट देवु या.

## मांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई

**प्रतिनिधी / गोंदिया**

नायलॉन मांजा विक्रीवर प्रतिबंध लावण्यात आला आहे. शहरात अनेक ठिकामी अवैधरित्या मांजा विक्री केली जात आहे. दरम्यान ६ जानेवारीला शहर पोलिसांनी सिव्हील लाईन येथील एका दुकानात धाड कारवाई करून ८ हजार रुपये किंमतीचा नायलॉन मांजा जप्त केला. नांयलॉन मांजा विक्रीवर प्रतिबंध लावण्यात आला आहे. परंतु, अवैधरित्या मांजा विक्री केली जात आहे. त्यातच कुणाल दिपककुमार कनोजिया रा. निरंकारी भवन, श्रीनगर याच्या मुख्य पोस्ट ऑफीस समोरील रस्त्यावर सिव्हील लाईन येथील दुकानात कारवाई केली असता, विविध रंगाचे ८ नग मोठी नायलोन मांजाच्या चक्री मिळून आल्याने ८ हजार रुपये किंमतीचा मुदेमाल जप्त करून आरोपी विरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत, मुख्याध्यापकाचा मृत्यू

### देवरी तालुक्यातील ग्राम मुरदोली परिसरातील घटना

**प्रतिनिधी / देवरी**

अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत मुख्याध्यापक गंभीर जखमी झाल्याची घटना काल मंगळवार (ता.०७ जानेवारी रोजी दुपारी ३:०० वाजे दरम्यान ग्राम मुरदोली परिसरात घडली होती. या अपघातात जखमी दुचाकीस्वाराला ग्रामीण रुग्णालय देवरी येथे प्राथमिक उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. परिस्थितीनुसार, त्यांच्यावर पुढील उपचारासाठी गोंदिया येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यातच उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या घटनेत मुकुंदा श्यामराव ताजणे (वय. ५८) असे अपघातात मृत झालेल्या मुख्याध्यापकाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, देवरी तालुक्यातील मुरदोली येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मुकुंदा ताजने हे आपल्या दुचाकी क्रं एम.एच.३५ ए.क्यू.०९९७ ने मुरदोली येथून मंगळवारी दुपारी ३:०० वाजता चिंचेवाडा येथे शालेय पोषण आहार ऑनलाइन माहितीच्या बैठकी करिता जात होते. या दरम्यान मुरदोली येथे राष्ट्रीय महामार्ग पार करीत असताना देवरी कडून नागपूरकडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत मुख्याध्यापक ताजने गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्यांना देवरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तेथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी गोंदिया येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले असता, उपचारादरम्यान त्यांच्या मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी देवरी पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस एकोडी क्षेत्राच्यावतीने आ.रहागंडाले व जैन यांचा सत्कार

**प्रतिनिधी / गोंदिया**

विधानसभा २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या नेतृत्वात तिरोडा विधानसभा क्षेत्रात महायुतीने प्रचंड बहूमताने यश प्राप्त केला. त्याअनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकोडी जिल्हा परिषद क्षेत्राच्या वतीने राजेश कटरे यांच्या निवास स्थानी पार पडलेल्या कार्यक्रमात निवडणुकीतील विजयाचे शिल्पकार माजी आमदार राजेंद्र जैन व नवनिर्वाचित आमदार विजय रहांगडाले यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

सत्कारमूर्ती माजी आमदार राजेंद्र जैन म्हणाले की, शेतकऱ्यांना बोनस, लाडकी बहीण योजना, मुलींना निःशुल्क उच्च शिक्षण, मोफत तीन सिलेंडर योजना, बळीराजा मोफत वीज योजना, यासारख्या विविध योजनांच्या माध्यमातून सरकारने प्रगतीची व उन्नतीची कामे केल्याने जनतेने महायुतीला पुन्हा जन आशीर्वाद दिला आहे. जनतेने खा. प्रफुल पटेलजी व महायुती सरकारवर दाखविलेला विश्वास कायम ठेवून विकासाची व प्रगतीचे कार्य करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी राजेंद्र जैन, विजय रहांगडाले, विनोद हरीणखेडे, प्रिया हरिणखेडे, राजेश कटरे, अश्विनी रविकुमार पटले, डॉ. बसंत भगत, डॉ. किशोर पारधी, प्रकाश पटले, रविकुमार पटले, द्वारका साठवणे, संगीता पताहे, हिरामण मसराम, कृष्णकुमार पटले, हितेश पताहे, संतोष रीनायत, मीनाक्षी कटरे, सेविका आगाशे, शुभम बोदेले, लक्ष्मी उपवंशी, शांतनू पारधी, तिजेश पटले, रामु पंधरे, राजेश बिसेन, रवींद्र सोनवाने, संजय चौधरी, फागुलाल चौधरी, बसंत नागपुरे, ज्योती नागभीरे, दीपा चौरागडे, स्वाती वाहणे सहित मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

### जाहिर सुचना

माझे पक्षकार 'मोतीलाल ओस्वाल होम फाईनेंस लिमिटेड' 'श्री सारंगधर सुखलाल पटले' यांना यांचे मालमत्ता वर कर्ज देण्यात येत आहे.

**मालमत्ता चा वर्णन खालील प्रमाणे आहे :-**

मौजा - कटंगीकला, त.सा. क्रं. २६, थाक नं. ७४, गट नं. १६८/१६९/१७०/१म, एरिया - ०.०२ H.R. Sq. Meter, प्लाट नं. १०,११

आम जनता ला सुचित करण्यात येत आहे की वर नुमद केलेल्या मालमत्ता ची ओरिजनल रजिष्ट्री ज्याचे रजिष्टर्ड दस्त क्रमाकं ७८४/२००१, दिनांक १७/०२/२००१ आहे. याची ओरिजनल रजिष्ट्री दस्त क्रमांक ७८४/२००१ श्री सारंगधर सुखलाल पटलेजी यांचे कडुन दिनांक २४/१२/२०२४ ला बाजारातून घरी जात असताना हारवली आहे व आता पर्यंत भेटली नाही. ज्याची माहिती गोंदिया शहर पोलिस स्टेशन ला दिनांक ०३/०१/२०२५ ला दिलेली आहे. म्हणून आम जनता ला सुचित करण्यात येत आहे की उपरोक्त मालमत्ता वर कोणाचेही कोणत्याही प्रकार चे हस्तक्षेप किंवा आक्षेप असेल तर ७ दिवसाचा आत पत्रा द्वारे कळवावे किंवा संपर्क करावे. ७ दिवसाच्या नंतर कोणत्याही प्रकार चा आक्षेप स्विकार होणार नाही.

दिनांक :- ०८/०१/२०२५
स्थान : गोंदिया

दीपक मुलचांदानी
वकील
सिंधी शाळे जवळ, गोंदिया
मो. ९३०७२४८८२२

### वनपरिक्षेत्र अधिकारी, बोंडे नवेगांव वन्यजीव अभयारण्य यांचे कार्यालय स्थित देवरी

कार्यालय-चिचगड़ रोड, देवरी पिन -441901 फोन 07199 299046 email- rfobonde@gmail.com

**जाहीर निविदा सूचना**

नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदिया अंतर्गत नवेगांव वन्यजीव अभयारण्य वनपरिक्षेत्र बोंडे यांच्या वतीने खालील कामासाठी B1 दोन लिफाफा पध्दतीने सार्वजनीक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजीकृत कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. खालील कामाची निविदा केवळ निविदा पध्दतीने बंद लिफाफ्यात सादर करावयाची आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा सोबत भरावयाचे इसारा रक्कम १% | कोऱ्या निविदेची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | Deepening and winding of forest Nallha at At Compt.685.686 Beat Bonde-2 Round Bonde Range Bonde | ९८११७०/- | ९८१२/- | ५००/- | |

**निविदा प्रसिध्दीचा तपशिल**

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | निविदा विक्रीचा दिनांक | ०९/०१/२०२५ ते १४/०१/२०२५ ला सायं. ४.०० वा. पर्यंत |
| २ | निविदा सादर करावयाचा शेवटच्या दिनांक | १५/०१/२०२५ ला सायं. ४.०० वा. पर्यंत |
| ३ | निविदा उघडण्याचा दिनांक | 16/01/2025 ला सायं. ४.०० वा. पर्यंत |

(एस.यु. मडावी)
वनपरिक्षेत्र अधिकारी, बोंडे
नवेगांव वन्यजीव अभयारण्य

**प्रतिलिपी** - मा. उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलिपी** - मा. सहाय्यक वनसंरक्षक, नवेगांव वन्यजीव अभयारण्य, यांना माहितीस सविनय सादर.

(एस.यु. मडावी)
वनपरिक्षेत्र अधिकारी, बोंडे
नवेगांव वन्यजीव अभयारण्य

जिमाका/गोंदिया/जाहिरात/२०२४/८४

# खबरदार! धनुभाऊ जर राजीनामा दिला तर!!

**खबरदार धनुभाऊ जर तुम्ही राजीनामा दिला तर! तुमची या देशाला अत्यंत गरज आहे, असे मत महाराष्ट्रातील विविध ठिकाणातून व्यक्त होत आहे. त्याचा आदर धनुभाऊंनी ठेवलाच पाहिजे. कुणीही कुणाला मारलं तर थेट मंत्र्याचा राजीनामा मागण्याची नवी फॅशनच महाराष्ट्रात तयार झाली आहे. पण धनुभाऊच्या मागे संपूर्ण देश भक्कमपणे उभा राहिला आहे. त्याचे एक आगळेवेगळे समाधान धनुभाऊंना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना जरूर मिळत असेल. गेल्या काही दिवसांपासून धनुभाऊंना बदनाम करण्याची मोहीमच आखण्यात आली आहे. त्यांच्या दुसऱ्या का तिसऱ्या क्रमांकाच्या पत्नीने देखील त्यांच्या बदनामीत भाग घ्यावा याला काय म्हणावे? जगाच्या नकाशावर शोधायचा प्रयत्न केला तर मस्साजोग नावाचे गाव सापडणार देखील नाही. अशा या गावातील एका सरपंचाची हत्या अतिशय क्रूर पद्धतीने करण्यात आली. पण त्या हत्येत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या राज्यातील मंत्र्याचा राजीनामा मागणे उचित ठरणार नाही, असे अनेक 'भाई'चे मत आहे. मुळातच बीड जिल्ह्यातील परळी हे गाव 'लोकशाहीच्या' (?) मार्गाने चालणारे गाव आहे. त्या गावातील सर्वात तगडा राजकीय नेता म्हणजे धनंजय मुंडे होय. आपल्या कर्तृत्वाने या नेत्याने मंत्रीपदाला गवसणी तर घातलीच, पण हळूहळू मुख्यमंत्रीपद व कालांतराने पंतप्रधान पदापर्यंत झेप घेण्याची ताकद या नेत्याची आहे. म्हणून या नेत्याला बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. पण त्यांचे समर्थक म्हणून धनुभाऊंचे लाखो 'भाई' सांगू इच्छितात की, खबरदार धनुभाऊ जर तुम्ही राजीनामा दिला तर! संपूर्ण महाराष्ट्र तुमच्या मागे ठाम उभा रहायला तयार आहे. कुणी तुम्हाला 'आका' म्हणेल कींवा 'आकाचा आका' म्हणेल तर म्हणू द्या. पण तेवढी खुर्ची शाबीत ठेवाच!**




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

छत्रपती संभाजी महाराजांची मुघलांनी ज्या पद्धतीने हत्या केली, अगदी त्याच पद्धतीने प्रामाणिक म्हणून गणल्या गेलेल्या व आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या संतोष देशमुख यांची झाली आहे. पण देशामध्ये अशा हत्या होत नाही का? असे अनेकांना वाटू शकते. धनुभाऊ तुम्ही चूक असाल किंवा बरोबर असाल, पण आम्ही मात्र तुमच्या बरोबर आहोत. त्यासाठी मराठा विरुद्ध वंजारी अशी विभागणी तुम्ही केली, तर त्याला देखील आमचा पाठिंबा राहील. उपमुख्यमंत्री अजितदादा या विषयावर मुळीच बोलत नाही. मुख्यमंत्री शांत आहे. त्यामुळे धनुभाऊ तुम्ही मुळीच घाबरू नका. तुम्ही तुमची राजकीय कारकीर्द अधिक उज्वल करून भविष्यात वाल्मीक कराडला राज्याचा गृहमंत्री करण्यासाठी प्रयत्न करावा. कुणाच्या पत्रकार परिषदेला तुम्ही घाबरू नये. कुणाची 'धस'फूस सुरू असेल, तर ती कशी कमी करायची त्याचे तंत्र तुमच्याकडे आहेच. त्यातच ती कोण अंजलीबाई तुमच्या विरोधात दंड थोपटून उभी आहे. पण तुम्ही महिलांचे संघटन तयार करून तिच्या विरोधात महिलांची ताकद दाखवून द्या. त्या संघटनेमध्ये करुणा मुंडे नावाच्या महिलेला घेऊ नका. कारण त्या फुटीर गटाच्या आहेत. धनुभाऊंना अनेकजण राजीनामा देण्यासाठी काही जुने दाखले देण्याचा प्रयत्न करतीलच. पण त्याला काही अर्थ आहे का? कोण ते एकेकाळी लालबहादूर शास्त्री देशाचे पंतप्रधान होते म्हणे.

तत्पूर्वी रेल्वेमंत्री असताना रेल्वेचा अपघात झाला आणि त्यांनी जबाबदारी स्वीकारून चक्क रेल्वेमंत्री पदाचा राजीनामा दिला होता. हे त्यांना पटले होते का बरं ? असं कधी करायचं असतं का? धनुभाऊ खरं म्हणजे तुम्ही लालबहादूर शास्त्री यांच्या आधी जन्माला आले असते, तर शास्त्रीजींनी देखील कदाचित आपला निर्णय मागे घेतला असता. परंतु आधीच्या लोकांनी नको तो इतिहास निर्माण केला. महाराष्ट्राचे एकेकाळचे मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी वैद्यकीय परिक्षेसाठी स्वतःच्या मुलीचे गुण वाढवून घेतले म्हणून विरोधकांनी गजर करताच त्यांनी राजीनामा दिला. बीडमध्ये एवढे मुडदे पाडले जात असताना कुणीतरी राजीनामा दिला होता का? पण या जुन्या लोकांनी असे का केले हेच कळत नाही.

सिमेंट प्रकरणात तत्कालीन मुख्यमंत्री ए. आर. अंतुले असो, विमानात हवाई सुंदरीशी झालेल्या घटनेमुळे रामराव आदिक असो, तसेच माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी आपल्या जावयासाठी भूखंडात फेरफार केला, म्हणून हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांचा चक्क राजीनामा घेतला होता. बाळासाहेब ठाकरे यांचे गोपीनाथ मुंडे यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध होते. परंतु धनुभाऊचेही तेवढेच संबंध आले असते, तर कदाचित बाळासाहेबांनी वेगळाही निर्णय घेतला असता. महाराष्ट्रातच नव्हे तर देश पातळीवर मोठी लोकप्रियता मिळविलेल्या माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या राजीनाम्याचे कारण तसे अत्यंत फुसके होते. काय तर म्हणे त्यांच्या मागे मागे ताज हॉटेलमध्ये अभिनेता मुलगा व रामसे बंधुनो पैकी एकजण सिनेमाच्या तयारीसाठी जात होते. केवढं वादळ उठलं होतं त्यावेळी. शेवटी विलासरावांनी राजीनामा देऊन टाकला.

दरम्यान 'बडे बडे शहरोमे छोटे-मोठे हादसे होते है' या एकाच वाक्याने महाराष्ट्रातील सर्वात सच्चा माणूस म्हणून ज्यांची ओळख आहे, अशा आर आर आबांनी देखील राजीनामा देऊन टाकला होता. तसं पाहिलं तर शिवराज पाटील चाकूरकर यांनी केलं तरी काय होतं? तर क्षणाक्षणाला ते कपडे बदलत होते. अशोक चव्हाण यांनी काय केलं होतं? तर मुख्यमंत्री असताना एक आदर्श घोटाळा केला होता. अनिल देशमुख यांना तर जवळपास एक वर्षभर तुरुंगात राहावे लागले. यापैकी कोणाचे पुरावे सापडले असे वाटत नाही. धनुभाऊचे देखील कोणतेच पुरावे शिल्लक दिसत नाही. कारण त्याबाबतीत ते अत्यंत हुशार राजकारणी म्हणून ओळखले जातात. त्यांच्यात समाजासाठी झटण्यासाठी इतके गुण आहे की, लक्ष्मण हाके नावाचा एक अलीकडच्या काळात उदयास आलेला एक



नेता व राज्यभर टाइमपास म्हणून ज्यांची प्रतिमा आहे व स्वतःला 'डंके की चोट'पे वकील म्हणून घेणारा गुणरत्न सदावर्ते नावाचा प्राणी धनुभाऊची पाठराखण करतात म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला बरे वाटते. त्यामुळे धनुभाऊच्या जवळपास देखील राजीनाम्याचा विचार कधीच पोहोचणार नाही. अटक होण्याची तर त्यांना मुळी भीतीच नाही. त्यातच महाराष्ट्राचे पोलीस उदारमतवादी आहेत. आरोपीच्या इच्छेविरूद्ध अटकेसाठी प्रयत्न करत नाहीत. अटक करून घ्यायची की नाही ते आरोपीच्या सद्सदविवेक बुद्धीवर सोडून मोकळे होतात.

महाराष्ट्रात आरोपीला जेवढं अभिव्यक्ती आणि संचार स्वातंत्र्य आहे तेवढं इतर कोणत्याच राज्यात नाही. पोलिसांनी जर आपल्या गणवेषाची बूज राखली आणि आपली विहित कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडली तर रस्त्यावर खेळणाऱ्या लहान लेकराच्या बाहुलीला हात लावायची कुणाची हिंमत होणार नाही, असे म्हटले जाते. धनुभाऊंनी वेगळे तरी काय केले? आपल्या आवडीचे सर्व कायद्याचे रक्षक बीड, परळी मध्ये आणून ठेवले व कुणाला हात लावायचा व कुणाला नाही लावायचा याचा निर्णय तर तेच घेतात. धनुभाऊंनी पोलीस, राजकारणी आणि गुन्हेगार यांची केलेली युती अनेकांना खटकत असेल. कायद्याचे राज्य आणि कायद्याची अंमलबजावणी धनुभाऊंचेच कार्यकर्ते करतील. त्यामुळे वाल्मीकअण्णा कराड, सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, सुधिर सांगळे यांना 'पोलीस मित्र' पुरस्कार दिला पाहिजे. धनुभाऊने कार्यकर्ते मात्र अत्यंत धाडसाचे तयार केले हे मानावेच लागेल. कारण 'मी मनात आणलं असतं तर अटकपूर्व जामीन मिळवू शकलो असतो' हे वाल्मिक कराडचे शब्द आपणाला काय सुचित करतात ? या वाल्मिक कराडच्या निमित्ताने पोथी पुराणातील वाल्या कोळ्याच्या कर्तबगारीचा सुद्धा राजकीय फडात पंचनामा झाला.

वाल्मिक कराडचे आत्मसमर्पण हे सरकारमधील कारभा-यांच्या भ्रष्ट कामाचा तर पुरावा आहेच. पण या निमित्ताने सरकारने शासकीय यंत्रणांना हाताशी धरून गुंड मवाल्यांना कसं पोसलंय याचे रसभरीत किस्से माध्यमातून प्रसारित होत आहेत. पण भाऊ कीती दिवस हे मीडियावाले लिहीतील, ओरडतील. त्यांनाही काही मर्यादा आहे की नाही? भविष्यात वाल्मिक क-हाडची फौज महाराष्ट्रात निर्माण झाली तर कुणाला आश्चर्य वाटू नये. बीडच्या दुर्दैवी संतोष देशमुख या सरपंचाने दोनच चुका केल्या. एक म्हणजे सरपंच म्हणून तो इमानदारपणाने कर्तव्य बजावत होता तर दुसरी चूक म्हणजे तो भांडण सोडवायला गेला आणि कायदा सुव्यवस्थेची बुज राखण्याचा त्याने कसोशीने प्रयत्न केला. पण त्यानेही असे का केले बर? धनुभाऊच्या गँगमध्ये सहभाग घेतला असता, तर त्याचीही गरीबी कायमची नष्ट झाली नसती का? पण त्याच्याकडून झालेल्या या दोन चुकांनी हे सरकार आणि गुंड मवाली इतकी जबरदस्त किंमत वसूल करतील हे तुम्हा आम्हालाच काय दस्तुरखुद्द संतोष देशमुखच्या स्वप्नात सुध्दा आले नसेल. आत्मसमर्पण करताना वाल्मिक कराडने जी भाषा वापरली ती सामान्य माणसाचे या महाराष्ट्रात जीव सुरक्षित नाही हेच दाखवत असली तरीही भाऊ तुम्ही वाल्याच्या मागे आपली ताकद राहूच द्या. कारण परिसरात पून्हा एखादा नवा संतोष निर्माण होण्याची हिंमतच कुणी करणार नाही. या प्रकरणातील संशयितांना कडक शिक्षा करण्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हटले असले, तरी धुभाऊ तुम्ही काळजी करू नका. मंत्रिमंडळात पंकूताई पण आहेच. तिथे आपली सेटिंग व्यवस्थित होईल. फक्त काही दिवस शांत रहावे लागेल. फडणवीस सर्व काही व्यवस्थित करतीलच.

दुसरे असे की, संतोष देशमुख हा हिंदू होता आणि एका हिंदू 'गँग'नेच त्याची अमानुषपणे हत्या केली आहे. त्याला हिंदू मुस्लिम असे लेबल लावता येत नाही म्हणूनच आता मराठा विरूद्ध वंजारी असे लेबल लावायला कार्यकर्ते तयार झाले आहे त्यामुळे धनुभाऊ तुम्ही काळजी करू नका. धनुभाऊ संतोष देशमुखच्या कन्येकडे अजिबात लक्ष देवू नका. तिचा आक्रोश ऐकायला वेळ कुणाला आहे? रडून रडून बसेल आपोआप शांत. पण देवाभाऊंकडे दुर्लक्ष करू नका. जे जे त्यांच्या बरोबर आहे, त्यांचे त्यांनी कोटकल्याण केलेलेच आहे. अजितदादांची काळजी करू नका. त्यांनी तोंडात मिठाची गुळणी धरलेलीच आहे. एक दिवस असा येईल की, अचानक तुम्हीच गृहमंत्री झाल्याची घोषणा होऊन जाईल. त्यानंतर अख्खा बीड जिल्हा तुमच्या विरोधात ब्रदेखील काढू शकणार नाही.

दोन दिवसापूर्वी तुमची व अजितदादांची भेट झाली व तुम्ही राजीनामा दिल्याची बातमी प्रसार माध्यमांना मध्ये पसरली, त्यावेळी आमच्या छातीत 'धस्स' झाले होते. पण बरं झालं तुम्ही एका शब्दात मी राजीनामा द्यायला नव्हे; तर नवीन वर्षाच्या शुभेच्छा द्यायला गेलो होतो असे सांगून बीड मधील रडणाऱ्यांना चांगलाच दणका दिला. शेवटी एवढेच सांगतो धनुभाऊ की, संपूर्ण समाज तुमच्या मागे ठाम उभा आहे. असे किती संतोष देशमुख आले गेले तरी तुम्ही काळजी करू नका. राजीनाम्याचा किंचितसाही विचार डोक्यात येऊ देऊ नका. अजून अनेक संतोष देशमुख आपल्याला निर्माण करायचे आहे. कार्यकर्ते शांत असले तरी तुमच्या आदेशाची वाट पाहत आहेत. एकदा तुमचा आदेश येऊ द्या, पुन्हा एकदा आपण सगळेजण सक्रिय होऊ. पण भाऊ तुम्ही तेवढा राजीनामा मात्र देऊ नका हं!

# एचएमपीव्हीचे चीनमध्ये थैमान

**(कालच्या अंकावरून पुढे)**

**उत्तरार्ध**

बीटाकोरोनॅव्हायरस या प्रजातीतील इतर विषाणू म्हणजे सार्स व मार्स होय. दि.१७ जानेवारी २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनाने सार्स-सीओव्ही -२ साठी अनेक आरएनए चाचणीचे मानदंड प्रकाशित केले व रिअल-टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन- आरआरटी-पीसीआर ही चाचणी कोरोना लागण झाल्याचे पुष्टीकरण करण्यासाठी प्रमाणित केली.

ही चाचणी विशेषतः नाकातून घेतलेल्या नमुन्यांची अथवा घशातून घेतलेल्या थुंकीच्या नमुन्यांवर केली जाते. चिनच्या शास्त्रज्ञांना कोरोनाव्हायरसच्या नमुन्याच्या विश्लेषणांती या विषाणुचे जनुकीय गुणसुत्र मिळवण्यात यश मिळाले. जगभरातील संशोधकांना स्वतःचे रिअल-टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन- आरआरटी-पीसीआर या चाचणीचे टेस्ट किट बनवण्यासाठी मदत होइल या उद्देशाने ते संशोधन चिनच्या शास्त्रज्ञांनी जाहीर प्रकाशित केले.

७ एप्रिल २०२० रोजी भारतात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पहाता राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेने एचएलएल लाइफकेयर लिमिटेड या सरकारी कंपनीने विकसित केलेले रॅपिड अँटिबॉडी ब्लड टेस्ट किटला प्राथमिक चाचणी म्हणून मान्यता दिली. १५ ते २० मिनिटांत होणाऱ्या या चाचणीच्या मदतीने कोरोना प्रादुर्भाव कोणत्या भागात वाढत आहे, याचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

या रॅपिड अँटिबॉडी ब्लड टेस्टची अचूकता केवळ ६० ते ७० टक्के आहे, असा चीनमधिल अनुभव आहे. अँटीबॉडी रक्त चाचणीत रुग्ण संक्रमित असल्याचे अढळल्यास त्या रुग्णांची जागतिक आरोग्य संघटनाने प्रमाणित केलेली आरआरटी-पीसीआर चाचणी होत राहील.

२०२४ च्या नववर्षाच्या आगमनाबरोबरच जगात परत एकदा कोव्हिड-१९ने डोके वर काढले होते. सर्वांच्या कानठळ्या बसल्या आहोत. भारततही त्याने धडाकेबाज एन्ट्री केली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार ५ जानेवारी २०२४ रोजी भारतात कोविड-१९चे ७६१ रुग्ण आढळले. या आकडेवारीनुसार १२ नवीन मृत्यूची प्रकरणे देखील नोंदली गेली आहेत.

**कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**7775041086**

शुक्रवारी मिळालेल्या माहितीनुसार देशभरातील सक्रिय कोविड-१९ प्रकरणे ४,४२३ वरून ४,३३४ पर्यंत कमी झाली. सक्रिय रुग्णांच्या संख्येत केरळ पहिल्या क्रमांकावर होते. केरळमध्ये सध्या १,२४९, कर्नाटकात १,२४०, महाराष्ट्रात ९१४, तामिळनाडूमध्ये १९०, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशमध्ये १२८ सक्रिय प्रकरणे होती. मृत्युमुखी पडलेल्या १२ जणांपैकी पाच जण केरळमधील होते.

कर्नाटकात चार, महाराष्ट्रात दोन आणि उत्तर प्रदेशात एकाचा मृत्यू झाला. ५ डिसेंबरपर्यंत दैनंदिन रुग्णांची संख्या दुहेरी अंकात होती, मात्र थंडी वाढल्यानंतर रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत गेली.

कोविड-१९च्या नवीन प्रकार जेएन-१चे प्रकरण १२ राज्यांमध्ये ६१९पर्यंत वाढले. ७६१ न्यू कोरोनाव्हायरस कर्नाटकात जेएन-१चे १९९, केरळमध्ये १४८, महाराष्ट्रात ११०, गोव्यात ४७, गुजरातमध्ये ३६, आंध्र प्रदेशात ३०, तामिळनाडूमध्ये २६, दिल्लीत १५, राजस्थानमध्ये चार, तेलंगणा, ओडिशा आणि हरियाणात प्रत्येकी एक केस होती.

आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार राष्ट्रीय पुनर्प्राप्ती दर ९८.८१ टक्क्यांवर पोहोचला. वेबसाइटनुसार देशभरात आतापर्यंत २२०.६७ कोटी कोविड-१९ डोस देण्यात आले. यंदा चीनमध्ये कोविडसदृश विषाणू ह्युमन मेटाप्युमो व्हायरस- एचएमपीव्हीच्या वाढत्या प्रकोपामुळे भारत सरकारने शनिवार ४ जानेवारी रोजी सावधगिरीचे उपाय म्हणून संयुक्त देखरेख गटाची बैठक घेतली. बैठकीनंतर सरकारी गटाने सांगितले की फ्ल्यूचा हंगामात लक्षात घेता चीनची परिस्थिती गंभीर झाली आहे.

सरकार परिस्थिवर बारीक लक्ष ठेवून आहे. श्वासोच्छवासाच्या आजारांबाबत कोणत्याही वाढीला सामोरे जाण्यासाठी भारत पूर्णपणे तयार आहे. संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज आहे. एचएमपीव्ही अगदी सामान्य व्हारस आहे, नागरीकांनी घाबरून न जाता कोरोनाप्रमाणे प्रतिबंधक उपाय पुरेपूर योजत राहावे. असेही सरकारने सुचविले आहे. कोरोनासदृश आजारास तोंड देण्यासाठी सर्वांनी सजग पाऊले टाकलेलीच फायद्याची ठरतील, हे सांगणे न लगेच!

●●●●●●

# बिबट्यांची दहशत

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

पूर्वी क्वचितच नजरेस पडणारे बिबटे आता सर्रास नागरी वस्तीत दिसू लागले आहेत. दररोज कुठे ना कुठे बिबट्याने घुसखोरी केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच.

पूर्वी फक्त ग्रामीण भागात दिसणारे बिबटे आता पुण्या - मुंबई सारख्या मेट्रो शहरातही दिसत आहेत. मोठ्या शहरातील सोसायटी आणि कॉलनीतही बिबटे येत आहेत. बिबट्यांच्या या वाढत्या घुसखोरीमुळे नागरी वस्तीत भीतीचे सावट निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात तर सर्रास बिबटे नजरेस पडत आहेत. सध्या ग्रामीण भागात ऊस तोडणी सुरू आहे. उसाच्या शेतात बिबट्यांची पिल्ले सापडत आहेत.

ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर नित्याचा बनला आहे. नागरी वस्तीत आणि शेतांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांना पकडण्यासाठी वन विभागाकडून पिंजरे लावण्यात येतात. बिबटे नागरी वस्तीत घुसून पाळीव प्राण्यांचा फडशा पाडत आहे. काही वेळा तर बिबट्यांकडून नागरिकांवर जीवघेणे हल्ले देखील होत आहेत. दौंड, शिरूर या तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात एक महिला व दोन मुलांना जीव गमवावा लागला आहे.

दौंड, शिरूर, आंबेगाव, जुन्नर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यात बिबट्यांनी उच्छाद मांडला असून या भागात बिबट्यांची मोठी दहशत निर्माण झाली असून नागरिक भयभीत झाले आहे त्यामुळेच या नरभक्षक बिबट्यांना वन विभागाने ठार करावे अशी मागणी नागरिक करत आहेत.

अर्थात नरभक्षक बिबट्यांना ठार करणेच योग्य. याआधीही वन विभागाकडून नरभक्षक बिबट्यांना ठार मारण्यात आले आहे. काही वर्षापूर्वी जळगाव जिल्ह्यात एका नरभक्षक बिबट्याने उच्छाद मांडला होता. या नरभक्षक बिबट्याला वन विभागाकडून ठार मारण्यात आले होते. बिबट्यांना नागरी वस्तीत घुसखोरी का करावी लागते याचाही विचार आपण करायला हवा. बिबट्यांचा जो नैसर्गिक अधिवास समजला जातो ते जंगल आज राहिले नाही. माणसांनी स्वतःच्या फायद्यासाठी जंगलतोड केली. बिबट्यांना नैसर्गिक अधिवास राहिला नाही. माणसांनी बिबट्यांच्या नैसर्गिक अधिवासात अतिक्रमण केले. माणसांनी बिबट्यांचा निवारा हिसकावून घेतला. माणसानेच आधी बिबट्याच्या निवाऱ्यात घुसखोरी केली. त्यामुळे बिबट्याही आता नागरी वस्तीत घुसखोरी करीत आहेत.

बिबट्यांनी जर नागरी वस्तीत घुसखोरी करू नये असे आपल्याला वाटत असेल तर बिबट्यांना पुन्हा त्याचा नैसर्गिक अधिवास मिळवून द्यायला हवा. यासाठी वन विभागाने जंगलतोड थांबवायला हवी. वन विभागाने वृक्षारोपण मोहीम राबवून ते वृक्ष जगवले पाहिजे. जंगलामध्ये रानावनामध्ये झुडपांची लागवड केली पाहिजे जर बिबट्यांना लपण्यासाठी झाडे झुडपे मिळाली तर ते शेतामध्ये येणार नाहीत. बिबट्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवास मिळाला तर बिबटे नागरी वस्तीत घुसखोरी करणार नाहीत. ●●●●

# मकर संक्रांतीला करा तिळगुळाचे लाडू



नवीन वर्ष सुरू झाल्यानंतर पहिला सण मकर संक्रांत हा असतो. हा हिंदू धर्मातला महत्त्वाचा सण मानला जातो. जेव्हा सूयार्चा मकर राशीत प्रवेश होतो तेव्हा मकर संक्रांत साजरी केली जाते. हा सण देशभरातील राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे साजरा केला जातो. या दिवशी तीळ आणि गुळाचे लाडू बनवण्याची परंपरा आहे. मकर संक्रांत हा सण हिवाळ्यात येत असल्यामुळे या सणाला तिळापासून बनवलेल्या गोष्टी खाल्ल्या जातात. प्रत्येक घरामध्ये संक्रांतीला तिळ गुळाचे लाडू तयार केले जातात. या मकर संक्रांतीला तुम्ही तिळगुळाचे लाडू बनवणार असाल तर जाणून घ्या सोपी रेसिपी.

**साहित्य :**

गुळ, तीळ, वेलची पूड, शेंगदाणे, बदाम, किसलेले खोबरे, काजू

**कृती :** सर्वप्रथम तीळ स्वच्छ करून घ्या त्यामध्ये खडे किंवा कचरा नाही याची खात्री करून घ्या. यानंतर एका जाड तळ असलेल्या पान ठेवा आणि मंद आचेवर तीळ थोडावेळ भाजून घ्या. तीळ तडतडायला लागले आणि हलके सोनेरी दिसू लागले की गॅस बंद करा आणि तीळ एका प्लेटमध्ये बाजूला काढून ठेवा.

तीळ भाजल्यानंतर त्याच पॅनमध्ये शेंगदाणे नीट भाजून घ्या म्हणजे त्यांचा कच्चापणा निघून जाईल आणि ते थोडे कुरकुरीत होतील. त्यानंतर एक कपडा घेऊन शेंगदाणे चोळून घ्या ज्यामुळे त्याची साले निघून जातील. बदामाचे छोटे छोटे तुकडे करून ते गावरान तुपामध्ये भाजून घ्या.

यानंतर किसलेले खोबरे ही थोडेसे सोनेरी होईपर्यंत भाजून घ्या. तीळ आणि शेंगदाणे दोन्ही मिक्सरमध्ये टाकून बारीक करून घ्या. मंद आचेवर एक पॅन ठेवून त्यामध्ये गुळाचे छोटे छोटे तुकडे करून टाका आणि गूळ वितळून घ्या. गुळ वितळण्यासाठी चुकूनही पाण्याचा वापर करू नका हळूहळू गूळ वितळल्यानंतर तो घट्ट चिकट पदाथार्सारखा तयार होईल.

गुळ पूर्णपणे विरघळल्यानंतर तीळ आणि शेंगदाणे त्यासोबतच वेलची पूड, किसलेले खोबरे, बदाम इत्यादी साहित्य घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या. आता हाताला तूप लावा आणि लाडू बनवायला सुरुवात करा. मिश्रण पूर्णपणे थंड होण्यापूर्वी तुमचे लाडू तयार करा. हे मिश्रण थंड झाल्यानंतर मिश्रणाला लाडूचा आकार देणे शक्य होणार नाही.

●●●●●●

## अशोकायन

### दृष्टी - दृष्टीकोन

असेल दृष्टी
तर दिसेल सृष्टी
असेल अंतरदृष्टी
तर दिसेल -
पडद्यामागील सृष्टी ..

समजेल मग
दिसते तसे नसते
म्हणून जग फसते ..
अर्थात
काय भुललासी
वरचिया रंगा
उस डोंगा परि
रस नोहे डोंगा ..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## कुंभमेळ्याचे महत्त्व

**वाचक लिहितात**

यावर्षी १३ जानेवारीपासून प्रयागराज येथे कुंभमेळा सुरू होत आहे. कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठा संस्कृतीक आणि धार्मिक मेळा आहे. या काळात भारतातील हिंदू धर्मीय आस्तिक लोक, साधक, भक्त, साधू-संत एकत्र येऊन कुंभ पर्वात पवित्र नदीत स्नान करतात. यावेळी संतांची प्रवचने ऐकणे, ध्यानधारणा, साधना याद्वारे आपले जीवन आध्यात्मिक दृष्ट्या सुंदर होण्यासाठी प्रयत्न केले जातात. कुंभमेळ्यात श्रद्धाळूची अशी आस्था आहे की, यावेळी पवित्र नदीत डुबकी मारून स्नान केले की आपले पापक्षालन होते म्हणजेच पापा पासून मुक्ती मिळते. या आशेनेच हिंदू श्रद्धाळू पवित्र स्नानासाठी प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन, नाशिक येथे पोहोचतात. काहींना प्रश्न पडतो की केवळ याच नदीच्या किनारी कुंभमेळा का भरतो?

कुंभ याचा अर्थ कलश. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार कुंभमेळ्याचा इतिहास जवळपास 850 वर्ष जुना आहे. पौराणिक ग्रंथानुसार जेव्हा देव आणि असुर यांनी अमृत प्राप्त करण्यासाठी समुद्रमंथन केले. तेव्हा त्यातून मूल्यवान असा अमृत कलश निघाला. तो अमृत कलश घेण्यासाठी देव आणि असुरांमध्ये युद्ध झाले.

असुरांच्या पासून अमृत वाचवण्यासाठी विष्णूने तो अमृत कलश आपले वाहन गरुड याला दिला .असूरांनी गरुडाकडून तो कलश हिसकावून घ्यायचा प्रयत्न केला, तेव्हा त्यातील काही थेंब प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन, आणि नाशिक येथील नदीत पडले. तेव्हापासून दर बारा वर्षांनी या पवित्र नदीकाठी कुंभमेळा भरतो यावेळी सूर्य, चंद्र आणि बृहस्पती यांची स्थिती तीच राहते. प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि सरस्वतीचा संगम आहे. गंगा नदीचे पाणी पांढरे शुभ्र, यमुनेचे पाणी काळसर हिरवे, तर सरस्वती अदृश्य असते. प्रयागराज मध्ये श्रद्धाळू पवित्र जलात स्नान करून आपल्या आत्म्याची शुद्धी आणि मोक्षाची प्रार्थना करतात. यावेळी २०२५ मध्ये प्रयागराज येथे महा कुंभमेळा आहे. कुंभातील पहिले पवित्र शाही स्नान १३ जानेवारी पौष पौर्णिमेला सुरू होईल. १४ जानेवारीला मकर संक्रांतीला शाही स्नान, २९ जानेवारीला मौनी अमावस्या स्नान, २ फेब्रुवारीला वसंत पंचमी शाही स्नान होईल. या काळात ४ फेब्रुवारीला रथसप्तमी, १२ फेब्रुवारीला माघ पौर्णिमा आणि २६ फेब्रुवारीला महाशिवरात्र. महाशिवरात्रीचे शेवटचे स्नान पर्व असेल. यावेळी प्रयागराज येथील कुंभमेळ्यात स्नान करून आपणही आपल्या देहाची आणि मनाची शुद्धी करून घेऊया. आणि साधना करूया.

■ सौ. पल्लवी देशपांडे, दुर्ग, छत्तीसगढ.

# महिंद्रातर्फे प्रीमियम ईव्ही तंत्रज्ञान अधिक सुलभ, BE 6 आणि XEV 9e च्या टॉप व्हेरियंटच्या किंमती जाहीर



**पुणे, ८ जानेवारी :** महिंद्राने आज आपल्या अनलिमिट इंडिया टेक डे दरम्यान BE 6 आणि XEV 9e या प्रमुख इलेक्ट्रिक ओरिजिन एसयूव्हीच्या टॉप-एंड (पॅक थ्री) व्हेरियंटच्या किंमती जाहीर केल्या. ही घोषणा २६ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या अनलिमिट इंडिया कार्यक्रमाच्या यशस्वी सादरीकरणाच्या आधारावर करण्यात आली. याच कार्यक्रमात BE 6 आणि XEV 9e सादर करण्यात आल्या होत्या. महिंद्राचे प्रीमियम तंत्रज्ञान अधिकाधिक लोकांसाठी सुलभ करण्याचे ध्येय पॅक थ्री द्वारे साकारले जाते. पॅक थ्री लक्झरी, अत्याधुनिक वैशिष्ट्ये आणि अतुलनीय कामगिरी यांचे प्रतीक आहे. प्रीमियम ईव्हींकडे वाढत चाललेली ग्राहकांची प्रवृत्ती लक्षात घेऊन महिंद्रा BE 6 आणि XEV 9e या दोन्ही गाड्यांसाठी प्रारंभिक टप्प्यात फक्त पॅक थ्री चे सादरीकरण करेल. पॅक थ्री अधिक सहज उपलब्ध करून देण्यासाठी महिंद्राने थ्री फॉर मी नावाचा अभिनव कार्यक्रम सादर केला आहे. महिंद्रा फायनान्सद्वारे चालवला जाणारा हा कार्यक्रम सहा वर्षांनंतर बॅलून पेमेंटसह पॅक थ्री व्हेरियंट पॅक वनसारख्या मासिक ईएमआयवर खरेदी करण्याची संधी देतो.

महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडच्या ऑटोमोटिव्ह सेक्टरचे अध्यक्ष आणि महिंद्रा इलेक्ट्रिक ऑटोमोबाईल लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक विजय नाकरा म्हणाले, आमच्या इलेक्ट्रिक ओरिजिन एसयूव्हीला ग्राहकांकडून विलक्षण प्रतिसाद मिळाला आहे. ग्राहकांनी उच्च दर्जाचे तंत्रज्ञान आणि प्रीमियम वैशिष्ट्यांसाठी मजबूत आवड दाखवली आहे. म्हणूनच, आम्ही BE 6 आणि XEV 9e या दोन्ही गाड्यांसाठी फक्त 79 kWh पॅक थ्रीची नोंदणी व्हॅलेंटाईन डे दिवशी म्हणजेच १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सुरू करू. 79 kWh क्षमतेची बॅटरी ५०० किमीपेक्षा जास्त प्रत्यक्ष रेंज देते. त्यामुळे ग्राहकांची रेंजबाबतची चिंता कमी होईल. प्रीमियम ईव्ही मुख्य प्रवाहात आणण्याचे आमचे ध्येय आहे आणि आमच्या थ्री फॉर मी अर्थसहाय्य कार्यक्रमाद्वारे आम्ही ही वाहने अधिक सुलभ करत आहोत. पहिल्या टप्प्यात आमचे मासिक विक्री लक्ष्य ५००० युनिट्स आहे.

या एसयूव्हींच्या केंद्रस्थानी आहे MAIA महिंद्रा आर्टिफिशियल इंटेलिजन्स आर्किटेक्चर असून ते प्रति सेकंद ५० ट्रिलियन ऑपरेशन्स करण्यास सक्षम आहे. क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८२९५ द्वारे समर्थित आणि 24 GB RAM आणि 128 GB स्टोरेजसह, हे जगातील सर्वात वेगवान ऑटोमोटिव्ह ब्रेन आहे. भविष्यातील ड्रायव्हिंगचा अनुभव सुनिश्चित करत WiFi 6.0, ब्लूटूथ ५.२, Quectel 5G आणि ओव्हर-द-एअर अपडेट्ससह, हे तंत्रज्ञान रियल टाईम अपडेट्स, अखंड कनेक्टिव्हिटी आणि अत्यंत वेगवान प्रक्रिया शक्ती पुरविते.

# बॉस गर्ल वाइब्स: सिमरन कौर जमाई नं. १ मधील तिच्या व्यक्तिरेखेसाठी फिट होण्याबद्दल बोलत आहे!



**मुंबई, ८ जानेवारी :** झी टीव्हीवरील मालिका जमाई नं. १ आपल्या प्रीमियरपासून सर्व योग्य कारणांमुळे चर्चेत आहे. प्रेक्षकांच्या हृदयात स्थान निर्माण करणाऱ्या अभिषेक मलिक आणि सिमरन कौर यांना नील आणि रिद्धी या नावानेही ओळखले जाऊ लागले आहे. अलीकडील भागामध्ये, रिद्धी नानीला दिलेले वचन कसे पाळते आणि नीलला तिच्या ऑफिसमध्ये नोकरीची ऑफर देते हे दर्शकांनी पाहिले. मात्र यामागे एक छुपा अजेंडा आहे, रिद्धी एक बॉस गर्ल असल्याने, तिथे काम करू लागल्यानंतर नीलचे आयुष्य दयनीय बनवण्याची गुप्त योजना ती आखते.

सिमरन म्हणाली, माझा विश्वास आहे की फिट राहणे म्हणजे फक्त चांगले दिसणे नाही; तुम्हाला स्वतःचा बळकटपणा जाणवायला हवा आणि स्वतःबद्दल आत्मविश्वास वाटायला हवा. पिलाटेज हे माझ्यासाठी गेम चेंजर ठरले आहे. त्यामुळे मी केवळ माझ्या सर्वोत्तम शेपमध्येच राहत नाही तर त्यामुळे माझे लक्ष केंद्रित राहते आणि मी आनंदीही राहते. माझी व्यक्तिरेखा रिद्धी ही एक प्रबळ इच्छाशक्ती असलेली मुलगी आहे जिला तिला काय हवे आहे हे माहित आहे आणि ते पडद्यावर मांडण्यासाठी मी माझी शरीरयष्टी, देहबोली, माझे पोश्चर यांवर काम करत आहे आणि त्यासाठी पिलाटेजपेक्षा अधिक चांगले काय असू शकते. एक अभिनेत्री म्हणून आपल्या व्यक्तिरेखेप्रमाणे दिसणे आणि त्याच प्रकारे वाटणे हे महत्त्वाचे आहे हे मी जाणते. माझ्या ऑन स्क्रीन उपस्थितीमध्ये भर टाकण्यासाठी माझ्या फिटनेस महत्त्वाचा असून त्यामुळे मी एका शक्तिशाली बॉस गर्लची व्यक्तिरेखा अधिक चांगल्या प्रकारे दर्शवू शकते.

प्रेक्षकांसमोर सर्वोत्कृष्ट गोष्टी आणण्यासाठी कलाकारांनी पडद्यामागील केलेल्या प्रयत्नांचा पुरावा म्हणजे सिमरनची ही फिटनेसची आवड आहे. आगामी एपिसोडमध्ये, रिद्धी आणि तिची आई कांचन (पापिया सेनगुप्ता) यांच्या ऑफिसमध्ये प्रवेश करताना नीलसमोर निर्माण केलेल्या सर्व आव्हानांचा सामना नील कसा करतो हे प्रेक्षकांना पाहायला मिळेल.

# पतंग, मिठाई आणि कुटुंबासमवेत मौज: सोनी सबवरील कलाकार आपल्या मकर संक्रांतीच्या परंपरा आणि यंदाच्या योजना सांगत आहेत

**मुंबई, ८ जानेवारी :** मकर संक्रांत येते तेव्हा आपल्यासोबत आपल्या प्रियजनांच्या सहवासाची ऊब, परंपरांचा आनंद आणि नवीन शुभारंभाचे वचन घेऊन येते. देशभरात हर्षोल्लासाने साजरा होणाऱ्या या सणाचे आपल्या मनात एक आगळे स्थान असते कारण या सणाच्या निमित्ताने आपण कृतज्ञता व्यक्त करो, आपल्या संस्कृतीने दिलेल्या परंपरांचे पालन करतो आणि सुंदर आठवणी निर्माण करतो. आपल्यासाठी हा सण का विशेष महत्त्वाचा आहे, हे सांगत आहेत सोनी सब वाहिनीचे कलाकार- गरिमा परिहार, प्राची बंसल, आदित्य रेडीज आणि कृष्ण भारद्वाज.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका साकारणारी गरिमा परिहार म्हणते, मकर संक्रांत हा आपल्या देशात नव्या वर्षात येणारा पहिला सण असतो. मकर संक्रांतीच्या रूपाने आपल्याला नव्या जोमाने आणि उत्साहाने नववर्षाचे स्वागत करण्याचे निमित्त मिळते. या दिवशी मी सर्वसाधारणपणे अन्न दान तसेच इतर जीवनावश्यक गोष्टींचे दान करते आणि लोकांनाही चांगलेचुंगले करून जेवता यावे यासाठी माझा खारीचा वाटा देते. शूटिंग सुरू नसले तर मी मित्रांसोबत किंवा इतर प्रियजनांच्या सहवासात पतंग उडवण्याचा आनंद भरभरून उपभोगते. तो अनुभव फारच रोमांचक असतो. तिळगुळातील आपलेपणा आणि प्रियजनांसोबत समय व्यतीत करताना जीवनातील साध्या आणि छोट्या सुखांचे आणि आनंद आणि गोडवा पसरवण्याचे महत्त्व जाणवते.

तेनाली रामा मालिकेत कृष्णदेवराय राजाची भूमिका करणारा आदित्य रेडीज म्हणतो, आपल्या संस्कृतीमध्ये मकर संक्रांतीचे विशेष महत्त्व आहे. नवीन सुरुवात आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचे हे पर्व आहे. मी अभिनेता असल्याने जीवन खूप धकाधकीचे असते, पण तरीही मी शक्य असेल तेव्हा मी आपल्या परंपरा जपण्याचा प्रयत्न करतो. मला आठवते आहे, या दिवशी, घरातील वडील मंडळी सूर्योदयापूर्वी स्नान करत असत. मी देखील ही परंपरा सांभाळतो. आता पिता झाल्यामुळे मी हळूहळू या परंपरा माझ्या मुलामध्ये रुजवण्याचा प्रयत्न करत असतो. हे सगळे समजण्यासाठी अजून तो खूप लहान असला तरी पतंग उडवणे आणि तिळगूळ देण्यासारख्या छोट्या छोट्या कृतींमधून त्याला हळूहळू आपल्या परांपरांची ओळख होईल. संक्रांत हा सण एकत्र येण्याचा, तिळगुळासोबत आनंद वाटण्याचा आणि चिरस्मरणीय आठवणी निर्माण करण्याचा आहे. जीवन कितीही धावपळीचे झाले तरी थोडा विश्रांती घेऊन आपला वारसा साजरा करण्याचे स्मरण हे सण आपल्याला देत असतात.

तेनाली रामा मालिकेत तेनालीची भूमिका करणारा कृष्ण भारद्वाज म्हणतो, मकर संक्रांत आपल्याला आपल्या समृद्ध परंपरा आणि संस्कृतीचे स्मरण करून देते. लहानपणी मकर संक्रांत म्हणजे फक्त पतंग उडवण्याचा आनंद लुटण्याचा सण होता आणि मी फारच उत्साहात असायचो. पण आता मला वाटते की आपल्या आसपासच्या पक्षांची देखील काळजी घेतली पाहिजे. त्यामुळे आता मी पतंग उडवत नाही. त्याऐवजी माझ्या प्रियजनांना भेटण्याचा आनंद मिळवतो. आम्ही सगळे मिळून गोड-धोड खातो, खूप धमाल-मस्ती करतो आणि एकमेकांच्या सहवासाचा आनंद मिळवतो. साध्या साध्या क्षणांमधून आनंद घेण्याची आणि सुंदर आठवणींचे सर्जन करण्याची शिकवण हा सण देतो.

श्रीमद् रामायण मालिकेत सीतेची भूमिका करणारी प्राची बंसल म्हणते, मकर संक्रांत जवळ आली की राम-सीतेच्या नात्यात असलेली ऊब मला प्रियजनांच्या सहवासातून खुणावू लागते. माझ्यासाठी मकर संक्रांत हा रीचार्ज होण्याचा आणि आपल्या कुटुंबासोबत आणि मित्रांसोबत मजेत समय व्यतीत करण्याचा सण आहे. नेहमीप्रमाणे यावर्षीही मी पतंग उडवून, पारंपरिक मिष्टान्न सेवन करून आणि पुढील प्रवासासाठीची कृतज्ञता व्यक्त करून हा सण साजरा करणार आहे.

## कलाकारांनी विश्व हिंदी दिवस निमित्ताने सांगितले त्यांचे आवडते 'हिंदी' शब्द!

**मुंबई, ८ जानेवारी :** विश्व हिंदी दिवस निमित्त एण्ड टीव्ही कलाकार भारताच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या हिंदी भाषेचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व सांगण्यासोबत त्यांचे आवडते हिंदी शब्द आणि त्या शब्दांशी संलग्न असण्यामागील कारणे सांगत आहेत. हे कलाकार आहेत रवी महाशब्दे (मालिका 'अटल'मधील क्रिष्णन बिहारी वाजपेयी), स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), हिमानी शिवपुरी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील कटोरी अम्मा) आणि रोहिताश्व गौड (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारी). मालिका 'अटल'मध्ये क्रिष्णन बिहारी वाजपेयीची भूमिका साकारणारे रवी महाशब्दे म्हणाले, ''अभिनेता व लेखक असल्यामुळे मला दृढ विश्वास आहे की, हिंदी प्रमाणे इतर कोणतीही भाषा भावना वास्तविकपणे कॅप्चर करू शकत नाही. मला हिंदी दैनंदिन जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग असलेला देश व संस्कृतीचा भाग असण्याचा अभिमान वाटतो. हिंदी माझी आवडती भाषा आहे आणि आवडते एक किंवा दोन शब्द निवडणे खूप अवघड आहे. पण, एका शब्दाची निवड करायची झाली तर तो शब्द असेल 'आत्मनिर्भर', म्हणजेच स्वावलंबी. या शब्दामधून ताकद व स्वातंत्र्य दिसून येते, जे आपण व्यक्ती म्हणून देशासाठी प्रयत्न केले पाहिजे.'' मालिका 'भीमा'मध्ये धनियाची भूमिका साकारणाऱ्या स्मिता साबळे म्हणाल्या, ''हिंदी भाषा भारताचा इतिहास व संस्कृतीमध्ये खोलवर रूजलेली आहे. माझा आवडता हिंदी शब्द आहे 'अभ्युदय' म्हणजे समृद्धता. सुरूवातीला, या शब्दाचा उच्चार करणे आणि दैनंदिन संवादांमध्ये समावेश करणे अवघड गेले. तरीही हा शब्द माझा आवडता बनला, जेथे मी माझ्या मुलाला विकास व प्रगतीचे महत्त्व सांगताना हा शब्द वापरण्यास सुरूवात केली. लहान असो मोठे, त्याने काहीतरी यश संपादित केल्यानंतर मी म्हणायचे 'यह तुम्हारे अभ्युदय की शुरूवात है' (ही तुझ्या प्रगतीची सुरूवात आहे).''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये कटोरी अम्माची भूमिका साकारणाऱ्या हिमानी शिवपुरी म्हणाल्या, ''आपल्या संस्कृतीशी संलग्न राहणे महत्त्वाचे आहे आणि आपली मातृभाषा आपल्याला परिभाषित करते. कॉलेज दिवसपासून माझा आवडा हिंदी शब्द आहे 'नि:सर्ग सौंदर्य', म्हणजे निसर्गाचे सौंदर्य. हा शब्द लांबलचक व उच्चार करण्यास गुंतागूंतीचा असल्याने सुरूवातीला खूप अवघड वाटायचा, पण माझ्या कवितांमध्ये हा शब्द वापरण्यास सुरूवात केल्यापासून मी या शब्दाच्या प्रेमात पडले, तसेच मला त्याचा अर्थ समजला.

# कृष्ण भारद्वाज म्हणतो, तेनालीच्या भूमिकेने मला शांत राहून, सर्जनशीलतेने आव्हानांचा सामना करायला शिकवले

**मुंबई, ८ जानेवारी :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत एका महान दरबारी प्रज्ञावंताचा लक्षणीय प्रवास उलगडला आहे आणि त्यातून आपली प्रतिष्ठा गमावून बसलेल्या एका नायकाचा उदय दाखवला आहे. महान तेनाली रामाच्या भूमिकेत अभिनेता कृष्ण भारद्वाज कथानकात मोहकता, वाक्चातुर्य आणि रोमांच घेऊन आला आहे. सध्या सुरू असलेल्या कथानकात तेनाली रामा विजयनगरमध्ये वेषांतर करून वावरत आहे आणि कृष्णदेवराय राजाला दिलेल्या वचनाशी झुंजत असताना आपल्या प्रिय साम्राज्याच्या संरक्षणासाठी धडपड करताना दिसत आहे. नवीन आव्हाने आणि प्रतिकूलतांना तोंड देताना त्याची हुशारी आणि निष्ठा यांची कसोटी होणार आहे.

कृष्ण भारद्वाजशी केलेल्या मनमोकळ्या गप्पांमध्ये त्याने तेनालीचा प्रवास, ही महान व्यक्तिरेखा साकारण्यातील रोमांच आणि प्रेक्षक पुढे काय बघणार आहेत याविषयी सांगितले.

**१. तेनाली रामाच्या तुझ्या भूमिकेबद्दल तुला जे प्रेम आणि कौतुक मिळत आहे, त्याबद्दल तुला काय वाटते? कोण्या चाहत्याची एखादी संस्मरणीय आठवण?**

चार वर्षांपूर्वी मी तेनालीची भूमिका केली होती. आता ही मालिका परतली आहे, तर प्रेक्षकांचे प्रेम वाढतेच आहे, हे पाहून मला कृतज्ञता वाटते. एक संस्मरणीय आठवण म्हणजे, शूटिंग सुरू असताना एक तरुण फॅन तेनाली रामाच्याच पोशाखात मला भेटायला आला. त्याने मालिकेतला एक मजेदार संवाद देखील अचूक बोलून दाखवला. मी जे करत आहे, ते का करत आहे, याचे उत्तर मला अशा क्षणांमधून मिळते. मला हे बघून आनंद वाटतो की, इतक्या लोकांना ही व्यक्तिरेखा आपलीशी वाटते.

**२. तेनाली रामाची भूमिका करत असल्यामुळे प्रत्यक्ष जीवनात तुझ्या दृष्टिकोनात किंवा समस्या हातळण्याच्या पद्धतीत काही फरक पडला आहे का?**

अर्थात! तेनालीने मला शांत राहून, सर्जनशीलतेने आव्हानांचा सामना करायला शिकवले. मी बऱ्याचदा विचार करतो, या परिस्थितीत तेनालीने काय केले असते? एकदा सेटवर असताना निर्मिती संबंधी काहीतरी अडचण आली होती आणि त्यावेळी मी एक झटपट आणि विचित्र उपाय सुचवला! त्यावर सगळ्या टीमने गंमतीने म्हटले देखील की तेनाली माझ्या प्रत्यक्ष जीवनात उतरू लागला आहे!

**३. तुझ्या मते, तेनालीच्या व्यक्तिरेखेतून लोकांनी शिकवण घ्यावी असा सर्वात मोठा गुण कोणता आहे?**

दबावाच्या परिस्थितीत देखील शांत राहण्याची जी तेनालीची क्षमता आहे, ती प्रत्येकाने स्वतःमध्ये विकसित केली पाहिजे. परिस्थिती कितीही गुंतागुंतीची असली तरी तेनाली त्यामुळे गोंधळून जात नाही. उलट, आपले बुद्धीचातुर्य आणि सहानुभूती या गुणांच्या बळावर तो त्यावर उपाय शोधतो. बुद्धिमत्ता आणि कनवाळू मन यांचा संयोग झाल्यामुळे किती आश्चर्यकारक परिणाम मिळतात याची प्रचिती आपल्याला येते.

**४. हे महान व्यक्तिमत्त्व पडद्यावर साकारताना आलेली सर्वात मोठी अडचण कोणती होती?**

तेनाली रामाची भूमिका करण्याची संधी मिळणे हा मोठा सन्मान आहे, पण त्यात आव्हानेही आहेत. ऐतिहासिक तथ्यांशी प्रामाणिक राहून तेनालीची हुशारी आणि विनोदबुद्धी यांचा समतोल साधणे फार अवघड होते. आजच्या जगाशी त्याला सुसंबद्ध दाखवणे आणि या महान व्यक्तिमत्त्वाच्या वारशाचा आदर करणे यामध्ये किंचितच फरक आहे. या आव्हानामुळे मला एक अभिनेता म्हणून माझ्या कक्षा रुंदावण्याची स्फूर्ती मिळते.

**५. तेनाली रामाच्या व्यक्तिरेखेतील विनोद हा या मालिकेचा एक लक्षणीय पैलू आहे. कॉमिक टायमिंग आणि प्रामाणिकता दाखवण्यासाठी तू कोणत्या टेकनिक्स वापरतो?**

कॉमिक टायमिंग हे लय आणि सह-कलाकारांनी दिलेल्या क्यू मुळे साधते. मी स्वतःला तेनाली रामाच्या जागी कल्पून स्वाभाविक राहण्याचा प्रयत्न करतो. त्याच वेळी, दृश्याच्या संदर्भात विनोद अस्थानी वाटू नये, यासाठी दिग्दर्शकांशी बोलतो. कधीकधी, सेटवरील मंडळींच्या समोर मी पंच-लाइन्सची तालिम करतो. त्यांच्या प्रतिक्रियेवरून मला परिणामकारतेचा अंदाज घेता येतो.

**६. तथाचार्यांशी तुझे पडद्याच्या मागे कसे नाते आहे आणि त्यामुळे तुमच्या पडद्यावरील केमिस्ट्रीवर काय परिणाम होतो?**

पडद्याच्या मागे आमचे नाते खूप छान आहे. आमच्यात सतत थट्टा-मस्करी चालू असते. या नात्यामुळे तेनाली आणि तथाचार्य यांच्यातील प्रेम-द्वेषाचे नाते साकारणे सोपे होते. कधीकधी शूटिंगमध्ये आयत्या वेळी आम्ही काही संवाद उत्स्फूर्तपणे टाकतो आणि बऱ्याचदा असे उत्स्फूर्त क्षण प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरतात.

**७. सेटवर तुला कोणासोबत काम करताना सगळ्यात जास्त मजा येते आणि का?**

एकाच व्यक्तीची निवड करणे अवघड आहे, कारण सर्वच कलाकार जणू एका कुटुंबाचा भाग आहेत. पण एकच नाव घ्यायचे झाले तर मी पंकज बेरी यांचे नाव घेईन. सेटवरची त्यांची ऊर्जा सगळ्यांना चेतवणारी असते. मधल्या विश्रांतीत आमच्यात खूप हास्य-विनोद होत असतात. वातावरण हलकेफुलके ठेवणारी माणसे आसपास असली की वातावरण प्रफुल्लित राहते; विशेषतः ज्या दिवसांमध्ये दीर्घ काळ शूटिंग चालते, तेव्हा!

**८. तुझ्या व्यक्तिरेखेचा पुढचा प्रवास कसा असणार आहे याची कल्पना देशील का? आगामी भागांत कथानक कसे वळण घेणार आहे?**



मी जास्त सांगू शकणार नाही, पण हे नक्की की तेनाली रामाच्या बुद्धीचातुर्याची आता खरी कसोटी होणार आहे. संकट मोठे आहे आणि व्यक्तिगत आव्हाने आहेत. प्रेक्षकांना काही हृदयस्पर्शी क्षण, हुशारीने शोधलेले उपाय आणि काही अनपेक्षित ट्विस्ट बघायला मिळतील. ही व्यक्तिरेखा आणि कथानकातील हा महत्त्वाचा टप्पा आहे.

## आज का अंदाज

गुरूवार ९ जानेवारी २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४ | ५ | ७ | २ | ४ | ७ | ८ |
| १५७ | ५९० | १२२ | २५० | ६६० | १६७ | २६९ | १२५ |
| ४९० | २२० | ७९९ | १७९ | ४८० | ३५६ | ४५८ | २७९ |
| ३५५ | ६९९ | ३३९ | ३६८ | ५७० | २२० | ३६८ | ३५० |
| ३० | ४० | ५९ | ७९ | २१ | ४१ | ७३ | ८९ |
| ३१ | ४१ | ५८ | ७८ | २० | ४० | ७५ | ८५ |
| ३२ | ४२ | ५६ | ७६ | २९ | ४९ | ७६ | ८६ |

**९ जानेवारी: सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ८० | ९० |
| २७ | ५७ | ८६ | ९६ |
| २३ | ५३ | ५३ | ९४ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल, १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## सचेत आणि परंपरा यांनी संगीतबद्ध केले सा रे ग म प स्पर्धक उज्वल आणि पार्वती यांनी त्यांचे पहिले ओजी गाणे – 'तेरे संग'

**मुंबई, ८ जानेवारी :** झी टीव्हीचा सा रे ग म प भारतातील एक आवडता सिंगिंग रिॲलिटी शो, त्याच्या प्रतिभा, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या परिपूर्ण मिलाफाने प्रेक्षकांना मोहित करत आहे. अंतिम फेरीसाठी फक्त एक महिना बाकी असताना, स्पर्धा आता अधिक कडवी झाली आहे आणि अख्खा देश त्यांच्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आपल्या स्क्रीन्सला खिळून राहिले आहेत. सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली, ह्या प्रतिभावंत कलाकारांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रूपांतर केले जात आहे. ह्या वीकेन्डला दीर्घ प्रतीक्षेतील रेसटूदिफिनाले एपिसोड संगीतप्रेमींसाठी नक्कीच खास असेल कारण ह्या शोमध्ये संगीत उद्योगातील नावाजलेल्या ज्यूरी सदस्यांचे स्वागत केले जाईल. या भागादरम्यान प्रेक्षकांना टॉप ७ स्पर्धकांच्या काही उत्कृष्ट कामगिरीचा अनुभव घेता आला, तर स्पर्धक उज्वल गजभर आणि पार्वती मीनाक्षी यांचे पहिले ओजी गाणे 'तेरे संग' हे त्याचे मुख्य आकर्षण होते.


कार्यालय नगर परिषद, चिमूर, जि. चंद्रपुर

क्र./नपचि/आ.वि./२०२५/४८ दि.: ०८/०१/२०२५

निविदा सूचना

चिमूर नगर परिषद अंतर्गत आरोग्य व स्वच्छता विभाग अंतर्गत न.प. मालकीचे घंटागाडी ला साउंड सिस्टम व GPS सिस्टम पुरवठा व जोडणी बाबत. या कामाकरिता दिनांक १५/०१/२०२५ ला दुपारी ५:०० वाजेपर्यंत द्विलीफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फार्म विक्री दिनांक ०९/०१/२०२५ पासून उपलब्ध राहील. निविदेच्या शर्ती व अटी कार्यालयीन वेळेत नगर परिषद, चिमूर आरोग्य व स्वच्छता विभागात पहावयास मिळेल.

मुख्यधिकारी
नगर परिषद, चिमूर


## राशीभविष्य

**मेष :** कुटुंबाला वेळ देण्यावर भर द्या. शुभ कार्यक्रमावर मोठा खर्च होऊ शकतो. कुटुंबातील सदस्य आणि नातेवाईकांच्या उदासीन वागण्याने मन खूप दुखावले जाऊ शकते. नात्यात रस कमी होईल.

**वृषभ :** तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून भेटवस्तू मिळू शकते. व्यवसायात उत्पन्न चांगले राहील. पैशाअभावी अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण होतील. वाहन खरेदीची योजना यशस्वी होईल.

**मिथुन :** नोकरीत तुमच्या अधीनस्थ व्यक्तीकडून तुम्हाला पैसे मिळतील. सरकारी मानसन्मान मिळून प्रतिष्ठा वाढेल. पैसा आणि मालमत्ता चांगली राहील. व्यवसायात आर्थिक मदत मिळेल.

**कर्क :** तब्येत अस्वस्थ राहू शकते. दारूचे सेवन टाळा. वाहन चालवताना अतिरिक्त सावधगिरी बाळगा. गंभीर आजाराला बळी पडू शकतात. नवीन सहकारी व्यवहार आणि व्यवसायात उपयुक्त ठरतील.

**सिंह :** कोणाच्याही बोलण्यात फसू नका. नोकरीत बढतीचे योग येतील. राजकारणात मोठे पद मिळू शकते. काही महत्त्वाच्या योजनेवर काम कराल. आज तुम्ही कामाच्या ठिकाणी नफा वाढवण्यात यशस्वी व्हाल.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी कमालीचे व्यस्ता राहाल. तुमच्या नोकरीत तुम्हाला खोट्या आरोपांना सामोरे जावे लागू शकते. अनावश्यक वादविवाद टाळा. आवश्यक पैसे नातेवाईकांकडून प्राप्त होतील.

**तुळ :** नोकरीत अधिकाऱ्यांच्या निकटतेचा लाभ मिळेल. आर्थिक बाबींचा आढावा घ्या आणि धोरण ठरवा. जमा झालेल्या भांडवलाचा योग्य वापर करा. कोणाच्याही बोलण्यात फसू नका.

**वृश्चिक :** प्रभाव वाढत राहील. पदोन्नतीसह महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते. व्यवसायात प्रगतीची शक्यता आहे. नोकरीचा शोध पूर्ण होईल. तुम्हाला चांगली बातमी मिळेल. व्यवसायातील अडथळे दूर होतील.


**धनु :** इतरांचे वाईट शब्द मनावर घेऊ नका. राजकीय विरोधक षडयंत्र रचू शकतात. नको असलेल्या सहलीला जाणे टाळा. व्यर्थ पैशाची हानी चिंतेचे कारण बनेल. नोकरीत अधीनस्थ लाभदायक ठरतील.

**मकर :** आज आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न चालू ठेवा. पाठ आणि कंबरदुखीची समस्या गंभीर असू शकते. कानात काही त्रास होऊ शकतो. कामाच्या व्यस्ततेमुळे तुम्हाला शारीरिक थकवा आणि अशक्तपणा जाणवेल.

**कुंभ :** कर्ज देणे टाळाल. व्यवसायात मनापासून काम करा. इतरांची दिशाभूल करू नका. वडिलांकडून लाभ होण्याची शक्यता आहे.

**मीन :** आरोग्याबाबत सावध व सतर्क राहा. विद्यार्थी अभ्यासात व्यस्त राहतील. नोकरीच्या ठिकाणी नवीन मित्र बनतील. व्यवसायात भागीदारच उपयुक्त ठरेल.

## शब्दकोडे क्रमांक २०११



**आडवे शब्द :-**


१) वयोवृद्ध
४) अवधान
६) कानाजवळचा भाग
९) मऊ
११) गवंडी
१२) रम्य
१३) हिंमत, धैर्य
१५) घर
१७) मंदिर
१८अ) एक ज्वालाग्रही पदार्थ
१९) सुंदर शरीरची ठेवण, बांधा इ
२१) रतिचा पती
२४) बारा वर्षांचा काळ
२६) परस्पर
२९) बारीक झणझण
३०) उद्याच्या नंतरचा दिवस
३२) पोळी भाजण्याचे पात्र
३४) तृण
३६) बारीकसारीक
३९) कापसाची बी
४१) प्रामाणिक
४२) पदार्थाचा सूक्ष्म भाग
४३) तमाशातील नाट्य
४५) प्रारब्ध देवता
४६) कमळ
४८) बेचव
५०) उद्यान
५२) दात
५२) पद्धत
५३) विरोध
५५) लक्ष्मीचे एक नाव
५७) हत्तीवर बसण्याची सुशोभित बैठक
५९) प्रसार करणारा
६१) मस्त स्त्री
६३) दक्षतेचा इशारा
६५) वार्ताहर
६७) हाकेला दिलेले उत्तर
६८) पत्रातील साष्टांग नमस्कार
७०) व्यक्ती
७२) च्या बरोबर
७३) दुष्ट माणूस
७७) जोड
७८) रात्रभर
७९) घाबरणे
८०) एक रंगीत कंदमूळ

**उभे शब्द:-**

२) चांदणी
३) राजकारभाराचे शहर
४) वजन
५) वंदन
६) कायद्याप्रमाणे
७) गार
८) वधू-वर
९) रसवान
१०) अंतःकरण
१४) मांडी, आकडा बांबू
१६) मृत
१८) काळदेवता
२०) सुसर
२२) किंमत
२३) इंद्रिय, घटक
२५) पडणे
२७) हिस्सा, वाटा
२८) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
३०) घागरा
३१) एक द्विदल धान्य,
३३) दिवस
३५) कोल्ह्यासारखा एक जंगली श्वापद
३७) सोने
३८) लोणी
४०) किडा
४१) शिर्डीचे संत
४४) मगज
४६) प्रधानमंत्री
४७) विष
४९) दरबारातील मानकरी
५१) निर्धन
५४) गावाखालची जमीन
५६) सामान
५८) येशू ख्रिस्त
५९) खार--एक प्राणी
६०) लहान
६१) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
६२) वर्षानुवर्षे
६४) वस्ती
६६) पुत्र, मुलगा
६९) अब्रू
७१) काळोख
७२) सरळ वासा
७३) गाढव
७४) साठी बुद्धी **
७५) कापणे (इं.)
७६) पिशाचासाठी ठेवलेले अन्न
७७) संध्याकाळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## मोठ्या स्वप्नातच यशाची खात्री : पोलीस निरीक्षक ममता नंदागवळी

**गोंदिया :** झोपेत पडतात त्या स्वप्नांमुळे यशस्वी होता येत नाहीत तर जी स्वप्ने झोपूच देत नाहीत. त्या स्वप्नामुळे यशाचा मार्ग गवसतो. निश्चित ध्येय, वेळेचे नियोजन, भव्य दिव्य करण्याची महत्वाकांक्षा यातून ध्येयपूर्ती होते. यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने बघावीत आणि त्यासाठी अपार कष्ट करावेत, असे प्रतिपादन मुंबई येथे कार्यरत पोलीस निरीक्षक ममता नंदागवळी यांनी केले.

गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेत यशाचा मंत्र या विषयावर आयोजित व्याख्यानात पोलीस निरीक्षक नंदागवळी बोलत होत्या. गोंदिया शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक प्रफुल्ल पटेल, अध्यक्षा वर्षा पटेल, सचिव राजेंद्र जैन, संचालक निखिल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्या डॉ शारदा महाजन यांच्या नेतृत्वात महाविद्यालयीन विध्यार्थ्यांना योग्य वेळी स्पर्धा परीक्षा आणि त्यात यशस्वी होण्याचा मार्ग मिळाला तर त्यांचे यशस्वी होण्याचे खात्री वाढते या उद्देशाने पोलीस निरीक्षक ममता नंदागवळी यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. रवींद्र मोहतुरे, प्रमुख अतिथी म्हणून अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ.एस यु खान, कला शाखा प्रमुख डॉ.एच पी पारधी उपस्थित होते.

शिक्षण महर्षी मनोहरभाई पटेल यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मार्गदर्शकाचा परिचय प्रा.योगेश भोयर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन डॉ.किशोर वासनिक, प्रास्ताविक डॉ.एस.यु.खान तर आभार डॉ.भावेश जसानी यांनी मानले.

# फसव्या वाळू धोरणाचा घरकूल धारकांना फटका

## प्रति ट्रॅक्टर सात हजार इतका दर : लाभार्थ्यांचे बजेट कोलमडले



**गोंदिया :** राज्यातील नागरिकांना स्वस्त दराने वाळू मिळण्यासाठी तसेच अनधिकृत वाळू उत्खननाला आळा घालण्यासाठी नवे सर्वंकष सुधारित वाळू धोरण तयार करण्यात आले. या नव्या धोरणानुसार प्रायोगिक तत्त्वावर एक वर्षासाठी सर्व नागरिकांना प्रति ब्रास ६०० रुपये वाळूविक्रीचा दर निश्चित करण्यात आला. मात्र, या फसलेल्या वाळू धोरणामुळे गोंदिया तालुक्यासह जिल्ह्यातील बांधकाम करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना सहजतेने वाळू मिळणे कठीण झाले असून, सध्याच्या घडीला तालुक्यात वाळूचा दर प्रति ट्रॅक्टर सहा ते सात हजारांवर पोहोचला आहे. यामुळे ६०० रुपयांत एक ब्रास वाळू मिळणार, हे तालुक्यातील बांधकाम करणाऱ्या नागरिकांसाठी दिवास्वप्न ठरले आहे.

१ मे २०२३ रोजी राज्यात शिंदे सरकारमधील तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ६०० रुपयांत एक ब्रास वाळूचे स्वप्न दाखवले होते. त्याला दीड वर्षांचा कालावधी होऊनसुद्धा नागरिकांना बांधकाम करणाऱ्या गरजेइतकी वाळू मिळालेली नाही. त्यामुळे इच्छुक बांधकाम व्यावसायिक व घरमालकांना वाळू मिळेनाशी झाल्याने त्यांनी आपली बंद पडलेली बांधकामे सुरू करण्यासाठी चढ्या दराने वाळू उचलण्यास सुरुवात केली असल्याचे चित्र तालुक्यात पाहायला मिळत आहे. गोंदिया जिल्ह्यात वाळू विक्रीचे शासकीय डेपो बंद असल्याने महागड्या वाळूचा बांधकामासाठी उपयोग करावा लागत आहे. त्यामुळे राज्याचे वाळू धोरण फसले असल्याचे मत तालुक्यातील बांधकामधारकांनी व्यक्त केले आहे.

### नव्या वाळू धोरणाकडे सर्वसामान्यांचे लक्ष

राज्याचे नवनियुक्त महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना सुलभ होईल, असे वाळू धोरण राबविण्यात येईल, अशी ग्वाही दिली आहे. ते सुलभ वाळू धोरण लवकरात लवकर राबवावे, अशी सर्वसामान्य बांधकामधारकांची मागणी आहे.

## सालेकसात इतवारी- बिलासपूर इंटरसिटीचा थांबा द्या



### सामाजिक कार्यकर्त्यांचे रेल्वे प्रबंधकांना निवेदन

**साखरीटोला :** मुंबई-हावडा लोहमार्गावर सालेकसा रेल्वे स्थानक आहे. या रेल्वे स्थानकावरून मोठ्या प्रमाणात प्रवाशांची ये-जा असते. अशात अनेक प्रवासी रेल्वेगाड्यांचा येथे थांबा नसल्याने प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच मंडळ रेल्वे प्रबंधक (डीआरएम) दीपक कुमार गुप्ता ६ जानेवारी रोजी सालेकसा येथील रेल्वे स्थानकवर आले. असता सालेकसा येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेवून इतवारी -बिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेसचा सालेकसा येथे स्टापेज थांबा देण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन दिले.

सालेकसा रेल्वे स्थानकावर फक्त लोकल प्रवासी रेल्वेगाड्यांना थांबा असतो. तर प्रवासी दृष्टीकोनातून महत्वपूर्ण असलेल्या अनेक रेल्वेगाड्या सालेकसा येथे थांबत नाही. यामुळे प्रवाशांची कुंचबना होत असते. शिवाय प्रवासी गाड्यांच्या प्रतिक्षेत तासोनतास वाट पहावी लागत असते. यामुळे सालेकसा येथे इतवारी -बिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेसचा थांबा द्यावा, सालेकसा रेल्वे स्टेशनवर संपूर्ण सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावे, आदि मागण्या मंडळ रेल्वे प्रबंधक (डीआरएम) दीपक कुमार गुप्ता यांना निवेदनातून करण्यात आले. निवेदन देते वेळी ब्रजभूषण बैस, विक्की भाटिया, सुनील असाटी, विजय फुंडे, बाजीराव तरोने, मायकल मेश्राम, कैलाश अग्रवाल, बाबुलाल बहेकार, राजेश अग्निहोत्री, रवि बावनथडे, नीरज अग्नीहोत्री, शुभम जैन, विक्रम बैस, सौ.आरती शर्मा, अनिता पाथोडे, सौ.मीना बावनकर, सौ.हेमने, सौ सीमा बैस, सौ.छाया गभने, द्रौपदी बावनथडे आणि नागरीक उपस्थित होते.

# बीएसएनएलच्या सेवेने ग्राहकांची डोकेदुखी

## इंटरनेटसेवा विस्कळीत; ऑनलाईन कामे प्रभावित




**अर्जुनी मोरगाव :** तालुक्यातील महागाव परिसरात बीएसएनएल ग्राहकांची संख्या मोठी आहे. परंतु, ग्राहकांना सेवा योग्यरित्या मिळत नसल्याने मनस्ताप सहन करावा लागत आहे. इंटरनेट, कव्हरेजची समस्या नित्याचीच झाली आहे. परिणामी ऑनलाईन कामांना खोळंबा होत आहे. शिवाय कव्हरेजची समस्या निर्माण होत असल्याने संपर्क साधणेही कठीण होवून बसले आहे. याकडे सतत दुर्लक्ष होत असल्याने बीएसएनएलची सेवा ग्राहकांसाठी डोकेदुखीची ठरली आहे.

स्पर्धात्मक युगात खासगी टेलिकॉम कंपन्यांच्या तुलनेत बीएसएनएल माघारली आहे. आजही बीएसएनएल सेवा उपयोगात आणणारे अनेक ग्राहक आहेत. परंतु, सेवा सुरळीत मिळत नसल्याने ग्राहकांची कोंडी होऊ लागली आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील महागाव परिसरात बीएसएनएल सेवा वापरणारे अनेक ग्राहक आहेत. परंतु, या क्षेत्रात बीएसएनएल कव्हरेज समस्या निर्माण होत असल्याने इंटरनेट बंद, गति मंदावणे, संपर्क न होणे आदि विविध समस्या निर्माण होत आहेत. यामुळे ऑनलाईन कामांचा खोळंबा होत असून अडचणीचा सामना करावा लागत आहे. ही समस्या नेहमीच्याच झाल्याने ग्राहक इतर पर्यायाचा शोध घेत आहेत. ही समस्या वारंवार उपस्थित करूनही याकडे बीएसएनएलचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने अनेक ग्राहक बीएसएनएलची सेवा सोडून खासगी कंपन्यांकडे वळत आहेत.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

अर्जुनी मोरगाव तालुक्याच्या महागावसह परिसरात मागील काही दिवसांपासून बीएसएनएल मोबाईल नेटवर्क व इंटरनेट सेवा वारंवार विस्कळीत होत आहे. यामुळे ऑनलाईन कामांवर परिणाम झाला आहे. ग्राहकांकडून तक्रार करण्यात येत असली तरी याकडे सतत दुर्लक्ष केले जाते. खासगी कंपन्या ५-जी सेवा पुरवित आहेत. मात्र बीएसएनएलची सेवा ३-जी पेक्षाही कमकुवत आहे. यामुळे सेवेत सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. परंतु, वरिष्ठ अधिकाऱ्याकडून सेवेत सुधारणा करण्याला घेवून दिरंगाई केली जात असल्याने ग्राहक इतर पर्यायाचा शोध घेत आहेत.

## महिलांनी प्रगतीचे शिखर गाठावे : कोरोटे



**देवरी :** आजघडीला सर्वच क्षेत्रात महिलांनी उत्तुंग भरारी घेत यशाचे शिखर गाठले आहे. आजची महिला अबला नसून सबला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांनी यापासून बोध घेवून प्रगतीचे शिखर गाठावे. कारण महिलांची प्रगती ही समाजाची प्रगती आहे. त्यामुळे समाजाला दिशा देण्यासाठी सर्वच क्षेत्रात महिलांची उन्नती होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माजी आमदार सहषराम कोरोटे यांनी केले.

तालुक्यातील तुमडीकसा येथे ६ जानेवारी रोजी दुर्गा ग्राम संघाच्या वतीने महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्‌घाटन करताना माजी आमदार सहषराम कोरोटे बोलत होते. कार्यक्रमाला चिचगडचे ठाणेदार तुषार काळेल, मुरमाडीचे सरपंच रामदेव सोरी, राऊत, रामटेके, मेश्राम, गुलाबदाश हिरवानी, घनशाम मडावी, छगनलाल मुंगणकर तसेच दुर्गा ग्रामसंघाचे महिला भगिनी उपस्थित होते. विधीवत मेळाव्याचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला. दुर्गा महिला ग्रामसंघाची वाटचाल कौतुकास्पद असल्याचे मान्यवरांनी व्यक्त केले. या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी ग्रामसंघातील महिला पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### महिला मेळाव्याचे आयोजन थाटात

## ॲडव्होकेट डायरी तथा कॅलेंडरचे विमोचन



**गोंदिया :** जिला अधिवक्ता संघाच्या वतीने २०२५ ॲडव्होकेट डायरी तथा कॅलेंडरचे विमोचन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.टी.बी.कटरे होते. अतिथी म्हणून प्रमुख सत्र व जिल्हा न्यायाधिश अरविंद वानखेडे, जिल्हा अधिवक्ता संघाचे सचिव ॲड.रुपेंद्र कटरे आदि मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी ॲडव्होकेट डायरी तथा कॅलेंडरचे प्रमुख सत्र व जिल्हा न्यायाधिश अरविंद वानखेडे यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थितांचे आभार अधिवक्ता संघ सहसचिव ॲड.विश्वनाथ रहांगडाले यांनी केले.

# कलार समाजाच्या वतीने ना.जायसवाल यांचे स्वागत



**गोंदिया :** राज्याचे वित्त व नियोजन राज्यमंत्री ना.आशिष जायसवाल हे गोंदिया दौऱ्यावर आले होते. दरम्यान त्यांचे गोंदियात आगमनाप्रसंगी अखिल भारतीय कलार समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

ना.आशिष जायस्वाल हे प्रथमच गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. दरम्यान ते अखिल भारतीय कलार समाजाचे अध्यक्ष तथा शिवसेना प्रमुख मुकेश शिवहरे यांच्या त्यांच्या निवासस्थानी जैन कलार समाजाच्या वतीने आतिशबाजी सह पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कलार समाजाचे आराध्य दैवत भगवान सहस्त्रबहु यांच्या नावाची गेट गोंदिया शहरात तयार करणे व इतर समाजिक विषयावर चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी अखिल भारतीय कलार समाजाचे अध्यक्ष मुकेश शिवहरे, जैन कलार समाजाचे जिल्हाध्यक्ष एल.यु.खोब्रागडे, सचिव शालीकराम लिचडे, उमेश भांडारकर, सुखराम हरडे, गोपाल हजारे, राजकुमार पेशने, बालू लिचडे, मुकेश हलमारे, कमलेश सोनवाणे, देवानंद भांडारकर व कलार समाज बहुसंख्य समाज बंधू भगिनी उपस्थित होते.

# ढिवर समाजाने वीर एकलव्य सारखे अंगठा दान करु नये : मांढरे



**अर्जुनी/ मोरगाव :** वीर एकलव्य यांना ढिवर समाज आराध्य दैवत मानतो. ढिवर समाजाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. आजपर्यंत या समाजाचा आजपर्यत राजकीय वापर करण्यात आला. आजही मासेमारीच्या समस्या, शिक्षण, आरोग्य समस्या खूप प्रमाणात भेडसावत आहेत. राजकीय लोक फक्त आपला राजकीय उद्देश पूर्ण करण्याकरिता तात्पुरते सोबत घेतात. निवडून आल्यावर समाजाला वाऱ्यावर सोडतात त्यामुळे समाजाने अशा लोकांना गुरु मानून त्यांना अगठा दान करू नये, उलट सर्वांनी एकत्र येऊन राजकीय दबाव निर्माण करून आपल्या समस्या, मागण्या पूर्ण करण्यास भाग पाडावे, असे उदगार संघर्ष वाहिनीचे संयोजक उमराव मांढरे यांनी केले.

सिलेझरी येथे वीर एकलव्य जयंती कार्यक्रमाचे आयोजन ४ जानेवारी रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी मांढरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनार्धन नागपुरे होते. दीप प्रज्वलक सरपंच लताताई भेडारकर, सह उदघाट्क परेश दुरुगवार, ध्वजारोहक मणिराम मौज, उपसरपंच सुखदेव मेंढे तर प्रमुख पाहुणे अशोक शेंडे, राजू वलथरे, शालूताई कोल्हे, नंदू उके, केशवं कोल्हे, देवराम सिंदे, विशाखा वॉलदे, प्रकाश टेभुर्णे आदि मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये ऐकल्य रॅली, सांस्कृतीक कार्यक्रम, समाज प्रबोधन मेळावा, रांगोळी स्पर्धा, स्वच्छता अभियान असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारोती गोपे, संचालन ओमराज गोपे तर आभार श्रीपत गोपे यांनी केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मत्स्य गंधा महिला बचत गट, एकलव्य स्मारक समिती, दीपक गोपे, अविनाश मेश्राम, बलदेव मेश्राम, दिलीप गोपे, आसाराम गोपे व संपूर्ण ढिवर समाज सिलेझरी यांनी केला.

# शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन




**सालेकसा :** गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुका अत्यंत संवेदनशील, नक्षलग्रस्त, अविकसित आणि विविध समस्यांनी वेढलेला असून महाराष्ट्र शासनाचे वित्त व नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय तथा कामगार विभागाचे राज्यमंत्री डॉ.आशिष जैस्वाल यांच्या हस्ते शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे तालुका सालेकसा येथे भव्य दिव्य उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देताना ते म्हणाले की, मुंबई पासून हजारो किलोमीटर दूर असलेल्या पविपरीत परिस्थितीतही कार्यकर्त्यांचा शिवसेने प्रती असलेला उत्साह पाहून खूप आनंद होत आहे. आज शिवसेने साठी परिस्थिती अनुकूल असून, सार्वजनिक, सामाजिक, सामुहिक, वैयक्तिक समस्या या कार्यालयाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. आणि काम करतानी जानतेचता समस्या सोडविते वेळी अधिकारी,कर्मचारी जर सहयोग करत नसतील तर या साठी पक्ष श्रेष्ठीं व शिवसेने चे वरिष्ठ आणि मी तुमच्या जिल्ह्याच्या जवळच्या जिल्ह्यातील असल्याने तुमच्या तहसीलच्या विकास कामाकडे मी विशेष लक्ष देणार. या जनसंपर्क कार्यालयाच्या उदघाटन कार्यक्रमात शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र नायडू, जिल्हा समन्वयक डॉ.साठवणे, युवासेना जिल्हा प्रमुख अर्जुनसिंह बैस, महिला जिल्हा प्रमुख माया ताई शिवणकर, तालुका प्रमुख विजय नागपुरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## मामा तलावांचे अस्तित्व टिकविण्याची आवश्यकता

**गोंदिया :** पृथ्वीची तहान भागवणारी तळी स्वतःच आपले अस्तित्व सुरक्षित करण्याच्या संकटातून जात आहेत. तलाव ओसरण्याची किंमत आम्ही मोजत आहोत. भूजल पातळी खाली जात आहे. अनेक गोष्टींची साक्ष देणारे तलाव गावागावातून शहराकडे हळूहळू आकुंचन पावत चालले आहेत. त्याचबरोबर अनेक तलाव भरून आलिशान इमारती बांधल्या जात आहेत. प्रत्येक हंगामात पावसाची अनियमितता असते. आजही मोठी लोकसंख्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहे. तसेच सिंचनाची कायमस्वरूपी सोय नसल्याने जिल्ह्यातील पीक उत्पादनावर विपरित परिणाम होत आहे. सिंचनासाठी संपूर्णपणे मान्सूनच्या पावसावर अवलंबून राहावे लागते.



# मधुमेह व रक्तदाबाची नियमित तपासणी करावी : डॉ.चॅटर्जी

**सालेकसा :** वयस्क लोकांनी नियमित मधुमेह, रक्तदाब आणि हृदयरोगाची तपासणी करून घ्यावी. तसेच नियमित व्यायाम, आणि तणावमु संतुलित आहार जीवनशैली अंगिकारण्याचे महत्वाचे आहे. आजार व अपघात कधीही येऊ शकतात. यामुळे आरोग्य विमा काढावे, आपत्ती काळात विमा कवचामुळे मोठ्या आर्थिक संकटांपासून बचाव होतो, असे प्रतिपादन डॉ.देवाशिष चॅटर्जी यांनी केले.

तालुक्यातील दिशा आरोग्य कुटीर केंद्र, दरेकसा येथे २९ डिसेंबर रोजी आमगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील सेवानिवृत्त प्राचार्य व मुख्याध्यापकांचा स्नेह मिलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला वरिष्ठ चिकित्सक डॉ.देवाशिष चटर्जी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य दिनेश रहांगडाले, प्राचार्य व्ही.डी.मेश्राम, के.डी.घनोले, उल्हास लागडे, टी.एस.खोटेले, जी.एम.येडे, कमलबापू बहेकार, साधना कावळे, पुष्पलता तिवारी, डी.एच.मुरकुटे, जे.आर.कोल्हारे ओ.भार.देशमुख, पी.एस.कावडकर आदि उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.चॅटर्जी यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान दिशा आरोग्य कुटीर केंद्राचे कार्य आणि उपक्रम यांची माहिती देण्यात आली. या केंद्रात महिन्यातील दुसऱ्या आणि चौथ्या रविवारी आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. या शिबिरांत २५० हून अधिक रुग्णांची तपासणी आणि मोफत औषधोपचार केले जातात. सोनोग्राफी, सीबीसी, एक्स-रे व रक्त तपासणीसारख्या सेवा नाममात्र शुल्कात उपलब्ध करून दिल्या जातात. याचा आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागातील २५ गावातील रुग्णांना मोठा लाभ होत आहे. उपरोक्त कार्यक्रमात तालुक्यातील मलेरियाचे प्रमाण कमी करण्यासाठी राबवण्यात आलेल्या उपक्रमांवर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य व्ही.डी.मेश्राम यांनी केले. शेवटी उपस्थित मुख्याध्यापक, डॉक्टर आणि मान्यवरांचे आभार मानले.

### सेवानिवृत्त प्राचार्य व मुख्याध्यापकांचा स्नेह मिलन सोहळा



: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक : No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

# ग्लॅम वर्ल्ड

## आव्हान भूमिकेचं

अभिनेत्री पूजा हेगडेने विविधांगी भूमिका साकारल्या आहेत. मोहेंजोदाडोमधून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. पूजा दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत सक्रिय असते. पूजाने आपल्या अभिनयाबाबत भाष्य केलं आहे. अभिनय हा माझ्यासाठी आयुष्यातल्या बदलाप्रमाणे आहे, असं तिने म्हटलं आहे. मला आव्हानं स्वीकारायची आहेत, चौकटीबाहेरच्या भूमिका करायच्या आहेत, असं ती सांगते. आजवर मिळालेल्या संधींबद्दल मी कृतज्ञ असून येणाऱ्या काळात नवी आव्हानं स्वीकारून विविधांगी भूमिका साकारायला आवडतील, असं पूजा सांगते.



## ठसा 'गोल्डन ग्लोब' वरचा!

ऑस्कर पुरस्कारांआधी 'गोल्डन ग्लोब' पुरस्कारांची धूम असते. 'गोल्डन ग्लोब' मिळवणारे चित्रपट किंवा कलाकार ऑस्करच्या शर्यतीत आघाडीवर असतात, असं आजवरचं चित्र. 'गोल्डन ग्लोब' पुरस्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. त्यात कोणी बाजी मारली हे जाणून घेऊ या. 'गोल्डन ग्लोब'ची गणना जगातल्या प्रतिष्ठित चित्रपट पुरस्कारांमध्ये केली जाते. 'गोल्डन ग्लोब' पुरस्कार मिळावा, असं अनेक दिग्दर्शक, कलाकारांना वाटत असतं. ८२ वा गोल्डन ग्लोब पुरस्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. या सोहळ्यात भारतीय दिग्दर्शिका पायल कपाडियावर सगळ्यांच्या नजरा खिळल्या होत्या. तिच्या 'ऑल वी इमॅजीन इज लाईट' या चित्रपटाला नामांकन मिळालं होतं. या चित्रपटाला दोन विभागांमध्ये नामांकन होतं. 'बेस्ट नॉन इंग्लिश लँग्वेज मोशन पिक्चर' आणि 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक' या पुरस्कारांसाठी या चित्रपटाला नामांकन मिळालं होतं. त्यामुळे हा चित्रपट 'गोल्डन ग्लोब' पुरस्कार पटकावणार का, याबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. मात्र या चित्रपटाने निराश केलं आहे. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार बॅडी कॉरबेट यांना मिळाला असून त्यांना 'द ब्रूटलिस्ट' या चित्रपटासाठी नावाजलं गेलं आहे. दुसऱ्या विभागात 'ॲमिलिया पेरेज' या चित्रपटाने पुरस्कार पटकावला. यासोबतच अन्य विभागांचे पुरस्कारही जाहीर करण्यात आले आहेत. 'सर्वोत्कृष्ट स्टँड अप कॉमेडियन'चा पुरस्कार ॲली वाँगला देण्यात आला. दरम्यान, 'गोल्डन ग्लोब'मध्ये 'ऑल वी इमॅजीन इज लाईट'ला पुरस्कार मिळाला नसला तरी या चित्रपटाने आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठं नाव कमावलं आहे. या चित्रपटाने कान चित्रपट महोत्सवात पुरस्कार पटकावला. यासोबतच अन्य चित्रपट महोत्सवांमध्येही या चित्रपटावर कौतुकाचा वर्षाव झाला आहे.



## तृप्तीच्या मनातलं...

'ॲनिमल'मुळे तृप्ती डिमरीला नवी ओळख मिळाली. तृप्ती 'नॅशनल क्रश' ठरली. तिच्या अभिनयाचंही कौतुक झालं. 'ॲनिमल' हा महिलाविरोधी चित्रपट असल्याचीही टीका झाली. मात्र आपण चित्रपटाकडे अशा नजरेने पाहिलं नसल्याचं तसंच चित्रपटांवर अशा प्रकारचा कोणताही शिक्का मारत नसल्याचं तिने म्हटलं आहे.

'ॲनिमल' हा चित्रपट तुफान गाजला. चित्रपटाचं जेवढं कौतुक झालं तेवढीच त्यावर टीकाही झाली. 'ॲनिमल' हा हिंचाराला प्रोत्साहन देणारा, महिलाविरोधी चित्रपट असल्याचंही बोललं गेलं. 'ॲनिमल'बाबत प्रत्येकाची वेगवेगळी मतं असली तरी तृप्ती डिमरीला असं वाटत नाही. मुळात आपण चित्रपटाकडे त्या नजरेने पाहिलं नसल्याचं तिने म्हटलं आहे. मध्यंतरी झालेल्या एका मुलाखतीत तृप्तीने आपल्या बॉलिवूडमधल्या प्रवासाबद्दल आणि 'ॲनिमल'च्या अनुभवाबद्दल भाष्य केलं. 'ॲनिमल'कडे आपण महिलाविरोधी किंवा अन्य कोणत्याही नजरेने पाहिलं नसून चित्रपटातली भूमिका आणि ती निभावताना येणारी आव्हानं यांचाच विचार केल्याचं तिने म्हटलं आहे. आपण चित्रपटांना ठराविक साच्यात बसवत नसल्याचं किंवा त्यांच्यावर कोणताही विशिष्ट शिक्का मारत नसल्याचं ती सांगते. तृप्ती म्हणते, 'बुलबुल' आणि 'काला'सारखे चित्रपट करतानाही ते महिलाप्रधान आहेत किंवा काय, याचा विचार मी केला नव्हता. कोणत्याही भूमिकेची निवड करताना त्या भूमिकेची व्याप्ती, भूमिकेशी जोडलं जाणं आणि दिग्दर्शकावरचा विश्वास यांचा विचार करत असल्याचं तृप्ती सांगते. 'ॲनिमल'मध्ये तृप्तीने काहीशी नकारात्मक भूमिका केली होती. त्याबद्दल ती म्हणते, 'ॲनिमल'च्या आधी मी चांगल्या, सकारात्मक छटा असणाऱ्या भूमिका केल्या होत्या. मला काहीतरी वेगळं करायचं होतं. भूमिकेची गुंतागुंत आणि ती साकारायच्या आव्हानामुळेच आपण चित्रपट स्वीकारला. यासोबतच 'ॲनिमल'ची व्याप्तीच मुळात खूप मोठी होती. हा बिग बजेट चित्रपट होता. प्रत्येकालाच मोठे चित्रपट करायचे असतात. मीही त्याला अपवाद नाही. माझ्या आधीच्या चित्रपटांना समिक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. मात्र बॉक्स ऑफिसवरच्या यशासाठी मोठे चित्रपट स्वीकारावे लागतात. बिग बजेट असल्यामुळेही आपण 'ॲनिमल' स्वीकारल्याचं तृप्तीने स्पष्ट केलं.



## 'पुष्पा २' ८०० पार...

'पुष्पा २' चं वादळ अद्यापही शमलेलं नाही. नव्या वर्षातही 'पुष्पा २'दणकून कमाई करतो आहे. 'पुष्पा २' च्या हिंदी व्हर्जनने भारतात ८०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला असून अशी कामगिरी करणारा हा पहिलाच हिंदी चित्रपट ठरला आहे. यासोबतच 'मुफासा : द लायन किंग'नेही भारतात चांगली कमाई केली आहे. दुसरीकडे वरुण धवनचा 'बेबी जॉन' मात्र अपयशी ठरला आहे.

नव्या वर्षात कोणताही चित्रपट प्रदर्शित न झाल्यामुळे बॉक्स ऑफिसवर 'पुष्पा २' चं वर्चस्व असल्याचं दिसून येत आहे. गतवर्षी पाच डिसेंबरला प्रदर्शित झालेला 'पुष्पा २'महिना उलटून गेल्यानंतरही तिकिटखिडकीवर अक्षरश: अधिराज्य गाजवतो आहे. 'पुष्पा २' ने भारतभरात १२०८ कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय केला असून जगभरातल्या कमाईचा आकडा १८३१ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. 'पुष्पा २' ने हिंदी पट्ट्यात ८०० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली असून अशी कामगिरी करणारा हा पहिलाच हिंदी चित्रपट ठरला आहे. प्रदर्शित होऊन महिला उलटून गेल्यानंतरही 'पुष्पा २' दररोज कोट्यवधींची कमाई करत आहे. सरत्या आठवड्यातल्या शुक्रवारी या चित्रपटाने हिंदी पट्ट्यात सहा कोटी रुपये कमावले. 'पुष्पा २' च्या हिंदी व्हर्जनने ३२ दिवसांमध्ये ८१२.२० कोटी रुपये कमावले आहेत. जागतिक बॉक्स ऑफिसवरही 'पुष्पा २'चाच डंका वाजताना दिसतो आहे. हिंदी 'पुष्पा २' ने जागतिक बॉक्स ऑफिसवर १०७३.३९ कोटी रुपये कमावले असून चित्रपटाने या प्रवासात शाहरूख खानच्या 'पठाण'च्या एकूण कमाईला मागे टाकलं आहे. 'पठाण'ने जागतिक बॉक्स ऑफिसवर १०६९.८५ कोटी रुपये कमावले होते. आजच्या घडीला 'पुष्पा २' हा जगभरात सर्वाधिक कमाई करणारा तिसऱ्या क्रमांकाचा हिंदी चित्रपट आहे. 'पुष्पा २' च्यापुढे आता फक्त 'दंगल' आणि 'जवान' हे चित्रपट आहेत. त्यामुळे येत्या काळात 'पुष्पा २' 'जवान'ला मागे टाकू शकतो, असं जाणकारांचं म्हणणं आहे. 'दंगल'ला मागे टाकण्यासाठी 'पुष्पा २' ला बरीच मोठी मजल मारावी लागणार आहे. 'दंगल'ने २०५९.०४ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. 'पुष्पा २' हा आकडा गाठणार का, हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे. तिकडे 'मुफासा : द लायन किंग' या हॉलिवूडपटाला भारतात मोठं यश मिळालं आहे. 'मुफासा : द लायन किंग' हा २०२४ चा भारतात सर्वाधिक कमाई करणारा हॉलिवूडपट ठरला आहे. नाताळच्या सुट्टीदरम्यान मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे 'मुफासा : द लायन किंग'ने भारतात धुमाकूळ घातल्याचं दिसून आलं. शाहरूख खान आणि महेश बाबू ही मोठी नावं चित्रपटाशी जोडली गेल्याचा सकारात्मक परिणाम बॉक्स ऑफिसवर पहायला मिळाल्याचं जाणकाराचं म्हणणं आहे. 'मुफासा : द लायन किंग'ने भारतीय बॉक्स ऑफिसवर १३६.५० कोटी रुपये कमावले आहेत. 'पुष्पा २' आणि 'मुफासा : द लायन किंग' चांगली कामगिरी करत असताना वरुण धवनच्या 'बेबी जॉन'च्या पदरी मात्र अपयश पडलं आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कोणतीही चमक दाखवू शकला नाही. 'बेबी जॉन' बॉक्स ऑफिसवर ५० कोटी रुपयांचा आकडाही गाठू शकलेला नाही. चित्रपटाने १२ दिवसात अवघे ३८.५० कोटी रुपये कमावले आहेत. त्यामुळे आता या चित्रपटाने गाशा गुंडाळला असून वर्षाअखेरीस वरुण धवनच्या पदरी अपयश पडल्याचं दिसून येत आहे.



## आयुष्मान ऑन वर्क मोड

नवं वर्ष सुरू होऊन आता आठवडा झाला आहे. त्यामुळे आता बॉलिवूड कलाकारही कामाला लागले आहेत. प्रत्येक जण आगामी चित्रपटांच्या चित्रिकरणांमध्ये व्यस्त असल्याचं दिसून येत आहे. आयुष्मान खुरानाही २०२५ साठी सज्ज झाला आहे. आयुष्मान आपल्या 'थामा' या चित्रपटाचं चित्रिकरण सुरू करणार आहे. गेल्या वर्षाच्या अखेरीस चित्रपटाच्या चित्रिकरणाला सुरूवात झाली होती. हे चित्रिकरण मुंबईत झालं होतं. आता पुढचं चित्रिकरण दिल्लीत पार पडणार आहे. या चित्रपटात रश्मिका मंदाना आयुष्मानची नायिका आहे. तसंच परेश रावल आणि नवाजुद्दिन सिद्दीकी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. आयुष्मानला एका वेगळ्या भूमिकेत पाहण्यासाठी त्याचे चाहतेही उत्सुक आहेत.




## स्वप्नीलचा पोलिसी खाक्या

नव्या वर्षात वैविध्यपूर्ण मराठी चित्रपटांचा नजराणाच प्रेक्षकांना मिळणार आहे. नूतन वर्षाच्या पहिल्याच दिवशी प्रदर्शित झालेल्या 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी'ने प्रेक्षकांची मनं जिंकली. त्यानंतर आता स्वप्नील जोशीचा 'जिलेबी' प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

स्वप्नील जोशीने आजवर बॉय नेक्स्ट डोअर, रोमँटिक भूमिका केल्या. त्याने विनोदी भूमिकाही उत्तररित्या साकारल्या. 'वाळवी' या चित्रपटातून तो एका वेगळ्याच भूमिकेतून रसिकांसमोर आला. त्यानंतर आता त्याचा 'जिलेबी' हा चित्रपट चर्चेत आहे. चित्रपटाचं नाव 'जिलेबी' असलं तरी हा गूढ असा थरारपट आहे. या चित्रपटात स्वप्नील पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार असून आजवर गुडीगुडी भूमिका करणारा स्वप्नील बहुदा प्रथम पोलिसांच्या भूमिकेत दिसणार आहे. 'जिलेबी' ही एक मर्डर मिस्ट्री आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित करण्यात आला. स्वप्नीलने चित्रपटाचा ट्रेलर सोशला मीडियावर पोस्ट केला असून त्याला असंख्य लाईक्स मिळत आहेत. एक खून, अनेक आरोपी, रहस्याचा अविस्मरणीय, गोड थरार असं कॅप्शन त्याने दिलं आहे. यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता अधिकच वाढली असून स्वप्नीलला पोलिसाच्या भूमिकेत पाहण्यासाठीही त्याचे चाहते उत्सुक आहेत. चित्रपटात प्रसाद ओकचीही महत्त्वाची भूमिका असून अन्य नावाजलेले कलाकारही आहेत. एका खूनाचा शोध स्वप्नील घेणार आहे. हा शोध घेत असताना त्याच्यापुढे अनेक आव्हानं येतात. या सगळ्या आव्हानांना झेलत तो खुन्यापर्यंत कसा पोहोचणार, याची उत्कंठावर्धक कथा चित्रपटात पहायला मिळणार आहे.




## श्रद्धाचे नवे चित्रपट

श्रद्धा कपूरच्या 'स्त्री २' ला जबरदस्त यश मिळालं. येत्या काळात श्रद्धा तीन चित्रपटांमध्ये दिसणार आहे. आपण नवे तीन चित्रपट स्वीकारल्याचं श्रद्धाने म्हटलं आहे. स्त्री २ नंतर आपण आव्हानात्मक आणि वैविध्यपूर्ण भूमिकांच्या शोधात होतो, असं तिने सांगितलं. एक कलाकार म्हणून मला सतत आव्हानं स्वीकारायला आवडतात आणि या भूमिकांमुळे मला तशी संधी मिळते, असंही श्रद्धाने म्हटलं आहे. हटके संहितांमुळेही आपण हे चित्रपट स्वीकारल्याचं श्रद्धाने सांगितलं.



## दीपिकाच साकारणार सुमती!

'कल्की २८९८ एडी'मध्ये दीपिका पदुकोणने साकारलेली सुमती ही भूमिका खूपच गाजली. तिच्या अभिनयाचंही खूप कौतुक झालं. त्यानंतर ती चित्रपटाच्या सीक्वेलमध्ये दिसणार की नाही, याबाबत चर्चा सुरू झाल्या. मुलीच्या जन्मानंतर दीपिका आईपण अनुभवते आहे. सध्याच्या घडीला मुलीच्या जडणघडणीला प्राधान्य देणार असल्याचं दीपिकाने म्हटलं होतं. त्यामुळे 'कल्की २' मध्ये दीपिकाची जागा दुसरी अभिनेत्री घेणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. मात्र दीपिकाच्या जन्मदिनी कल्कीच्या टीमने तिला शुभेच्छा दिल्या आणि 'कल्की २' मध्ये दीपिकाच सुमतीची व्यक्तिरेखा साकारणार असल्याचे संकेतही दिले. त्यामुळे चाहत्यांनाही दिलासा मिळाला आहे.



## इंग्रजी बोर्डासह सर्व शाळांमध्ये लवकरच निर्णय लागू होणार

# महाराष्ट्रात मराठी शिकवणे अनिवार्य

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ८ :

पुढील शैक्षणिक वर्षापासून मराठी विषय सक्तीचा केला जाणार आहे. यासंदर्भात राज्य सरकार लवकरच औपचारिक घोषणा करणार असल्याचे शालेश शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आल्याचे समजते. इंग्रजी शाळांमध्येही मराठी शिकवणे बंधनकारक असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले. यातून कोणतीही पळवाट काढता येणार नाही, असेही दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी माध्यमांशी संवाद साधत शालेय शिक्षणाबाबतच्या अनेक सूचना आणि समस्या ऐकून घेतल्या. शिक्षण विभागाची पुढील वाटचाल कशी असेल, त्यासाठी काय करावे लागेल, याबाबत सध्या विविध घटकांशी चर्चा सुरू असून त्यातून शालेय शिक्षण विभागाचा रोडमॅप लवकरच तयार केला जाईल, असे दादा भुसे यांनी सांगितले.

राज्यातील शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला असला, तरी सीबीएसई, आयसीएसई, केंद्रीय शाळांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात चालढकल होत असल्याची चर्चा असते. हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा दादा भुसे यांनी दिला.




इंग्रजी भाषा आवश्यक असली, तरी महाराष्ट्रात मराठीचे महत्त्व सर्वांत जास्त आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जाही मिळाला आहे. इंग्रजी शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक असतानाही अनेक ठिकाणी तसे होत नसल्याच्या तक्रारी आहेत, असेही शालेय शिक्षण मंत्री म्हणाले.

राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणे सक्तीचे असल्याचा कायदा झाला, अशी माहिती दादा भुसे यांनी यावेळी दिली. त्यामुळे कोणत्याही माध्यमाची, कोणत्याही बोर्डाची आणि व्यवस्थापनाची शाळा असली, तरी हा नियम सर्वांना लागू आहे.

या नियमाच्या पालनाबाबत शिक्षण विभागाची करडी नजर या सर्व शाळांवर असेल, अशा सूचना दादा भुसे यांनी दिल्या. याबाबत टाळाटाळ करणाऱ्या शाळांची तक्रार पालकांना थेट शिक्षण विभागाकडे करता येणार असल्याचेही दादा भुसे यांनी स्पष्ट केले.

### शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

केंद्रीय मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य आहे. यातून त्यांना कोणतीही पळवाट काढता येणार नाही. याबरोबरच मराठी भाषेच्या अध्यापनाला अधिकाधिक व्यापक करण्यासाठी त्या शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान असायलाच हवे, असे दादा भुसे म्हणाले.

## संशयितांचे नमुने एम्समध्ये

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

उपराजधानीतील दोन मुलांना मेटान्युमोव्हायरस (एचएमपीव्ही)ची लागण झाल्याचे खासगी प्रयोगशाळेतील तपासणीत आढळले आहे. परंतु, या दोन्ही मुलांचे नमुने पुन्हा नागपुरातील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील (एम्स) प्रयोगशाळेत तपासले जाणार आहेत. गडचिरोलीतूनही चार संशयितांचे नमुने एम्सला तपासणीसाठी पाठवले जाणार आहेत.

नागपुरातील मेडिट्रिना या खासगी रुग्णालयात उपचारासाठी आलेला एक ७ वर्षीय मुलगा व १४ वर्षीय मुलगी या दोघांनाही सर्दी व खोकला होता. ३ जानेवारीला या दोघांनाही एचएमपीव्हीची लागण झाल्याचा अहवाल आला. त्यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागाने त्यांचे नमुने नव्याने तपासणीसाठी एम्सच्या प्रयोगशाळेत पाठवले. दोन्ही रुग्ण आधीच या आजारातून बरे झाल्याची माहिती मेडिट्रिना रुग्णालय प्रशासनाने दिली.

एचएमपीव्हीची लागण झालेले दोन्ही मुलांची प्रकृती स्थिर असून, ते शाळेत जात आहेत, अशी माहिती मेडिट्रिना रुग्णालयाचे संचालक डॉ. समीर पालथेवार यांनी दिली.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर म्हणाले, दोन्ही संशयितांचे नमुने नागपूर एम्स व एनआयव्ही पुणे या संस्थेत पाठवले आहेत. अहवालानंतरच आजाराबाबत स्पष्टता येईल. सध्या जिल्ह्यात एकही नोंदणीकृत रुग्ण नाही. नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही.

क्रिम्स रुग्णालयात सप्टेंबरमध्ये जबलपूरची ६१ वर्षीय महिला व नागपुरातील ७४ वर्षीय वृद्धेला दाखल करण्यात आले होते. तपासणीत त्यांनाही एचएमपीव्ही असल्याचे निदान झाले. नोव्हेंबरमध्ये नागपुरातील ७९ वर्षीय वृद्धालाही हा आजार असल्याचे निदान झाले होते. तिघांनाही यशस्वी उपचारानंतर घरी सोडण्यात आल्याचे क्रिम्स रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक अरबट यांनी सांगितले.

### ताडोबा ऑनलाइन बुकींग घोटाळ्यात सहभाग

## ठाकूर बंधुंच्या निवासस्थानी ईडीचा छापा

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. ८ :





ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ऑनलाइन बुकिंगच्या नावाखाली १२ कोटींहून अधिक रुपयांचा गंडा घातल्याप्रकरणी मुख्य आरोपी रोहित व अभिषेक बबलू ठाकूर यांच्या सरकारनगर येथील बंगल्यावर तसेच सर्व प्रतिष्ठानवर एकाचवेळी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) पथकाने बुधवारी पहाटे चार वाजता छापे टाकल्याने खळबळ उडाली. विशेष म्हणजे, यावेळी ठाकूर बंधू बाहेरगावी असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जगप्रसिद्ध ताडोबा अंधारी प्रकल्पात ऑनलाईन तिकीट विक्रीत १२ कोटीपेक्षा अधिकचा घोटाळा झाल्याचे ताडोबा प्रकल्पाचे संचालक तथा मुख्य वन संरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी उघडकीस आणले होते. या प्रकरणी डॉ. रामगावकर यांच्या तक्रारीवरून. रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हाही दाखल झाला आहे.

दरम्यान, नंतर हे प्रकरण न्यायालयात गेले. तिथे न्यायालयाने ठाकूर बंधू यांना पैसे जमा करण्यास सांगितले होते. तेव्हा ठाकूर यांनी २ कोटी ४१ लाख रुपये जमा केले आहेत.

१२ ऑक्टोबरपर्यंत ३ कोटी रुपये जमा करण्याची परवानगी मिळावी यासाठी त्यांनी नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ठाकूर बंधूंनी उर्वरित ३ कोटी रुपये जमा करण्यासाठी पुन्हा मुदत मागितली होती.

दरम्यान हे प्रकरण सुरू असतानाच सक्त वसुली संचालयाने बुधवारी पहाटे ठाकूर बंधू यांच्या सरकारनगर येथील निवासस्थानी तसेच स्वाद हॉटेल, पेट्रोल पंप व बेकरी तसेच इतर प्रतिष्ठान येथे छापे टाकले. कागदपत्रांची तपासणी सुरू आहे. नागपूर येथून पाच ते सहा इनोव्हा गाडीत हे पथक येथे दाखल झाले असून २५ अधिकाऱ्यांची टीम असल्याचे सांगण्यात येत आहे.

या घोटाळ्याची तक्रार डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी स्वतः सक्तवसुली संचालनालयाकडे केली होती. तसेच स्वतंत्र चौकशी करावी अशीही मागणी केली होती. त्यानंतर बुधवारी ईडी अधिकाऱ्यांचे पथक चंद्रपुरात धडकले. या चोकशीमुळे पुन्हा एकदा ताडोबा प्रकल्पातील बुकींग घोटाळा चर्चेत आला आहे.

# प्रवाशांची सुरक्षा आणि सुविधेला सर्वोच्च प्राधान्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :

मध्य रेल्वे अंतर्गत नागपूर हे देशातील अत्यंत महत्वपुर्ण स्थानक असुन रेल्वे प्रवाशाच्या दृष्टीने नागपूर मंडळ भारतीय रेल्वेला पुर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण अशा पध्दतीने जोडतो. रेल्वेचा प्रवास अधिक सुखद करण्या बरोबरच प्रवाशांची सुरक्षा आणि सुविधेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी सांगितले. रेल्वेच्या विविध उपक्रमांची माहिती देताना पत्र परिषदेत ते बोलत होते.

डीआरएम गर्ग म्हणाले, नागपूर येथून सुमारे १२५ ट्रेन दररोज ये जा करत असुन विस्तारीकरण योजनेअंतर्गत अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांना गती दिली जाणार असुन दिवसरात्र काम करणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांचे कल्याण साधण्यासाठी विशेष लक्ष पुरविले जाईल.

रेल्वे स्थानकावरील अनधिकृत विक्रेत्यांची समस्या जवळपास निकाली काढण्यात आली असुन प्रत्येक अधिकृत विक्रेत्याला क्युआर कोड देण्यात आला आहे. त्यांच्याकडील सर्व प्रमाणपत्रांच्या तपासण्याही करण्यात आल्या आहेत. फलाटावर प्रवाशांना विना अडथळा ये-जा करणे सुलभ व्हावे म्हणुन ४१० अनावश्यक पोल हटविण्यात आले आहे. रेल्वे प्रवासादरम्यान प्रकृती खराब झाल्यास वैद्यकीय सुविधेच्या आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून, नागपूर व ईतर काही स्थानकांवर केंद्र उभारण्यात आले आहेत. प्रवाशांची प्रकृती बिघडल्यास तीन मिनीटात डॉक्टर आणि वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊ शकेल, असेही त्यांनी सांगितले.



विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांची माहिती

नागपूर मंडळ अंतर्गत १५ रेल्वे स्थानकांना अमृत भारत स्टेशन म्हणुन विकसित करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार स्वयंचलित जीना आणि इतर सर्व सुविधा तातडीने पुर्ण करण्यावर भर दिला जात आहे. लहान स्थानकांचा विस्तार करुन त्यांनाही सुविधायुक्त बनविले जात असल्याचे गर्ग यांनी सांगितले. रेल्वेच्या तिस-या व चौथ्या लाईनचे काम प्रगती पथावर असुन निर्धारित वेळेत ते पुर्ण करण्याचा मानस आहे.

नागपूर मंडळ अंतर्गत 500 कोटी रुपयांची कामे सुरु असुन वंदे भारत एक्सप्रेस नागपूर ते पुणे व नागपूर ते मुंबई दरम्यान सुरु करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. नागपूर मंडळाने विविध धार्मिक दिनाचे औचित्य साधुन वेळोवेळी अतिरीक्त रेल्वेगाडया सुरु केल्यात. तसेच प्रायोगिक तत्वावर काही गाडयांना नरखेड व काटोल येथे थांबे देण्यात आले आहेत.

नागपूर मंडळ अंतर्गत समाविष्ट ९४ स्थानकांचा विकास केला जात असुन नागपूर येथील मध्यवर्ती आणि अजनी स्थानकाचे रुपडे पालटण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पत्र परिषदेला एडीआरएम खैरकर, चांदेकर, मित्तल, एसीएम संजय मुळे, पीआरओ यश जनबंधू यांच्यासह रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

: लोकसेवार्थ :

ग्रामीण दुर्बल कुटुंबांचा स्थायी स्वरूपाचा विकास व्हावा, त्यांना रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध व्हाव्यात या बरोबरच पर्यावरणाची समृद्धी होऊन सामाजिक मुल्यांचे संवर्धन व्हावे यासाठी बाएफ डेव्हलमेन्ट रिसर्च फौंडेशन ही संस्था कार्यरत आहे.

विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर व संशोधन, नैसर्गिक संसाधनांचा परिणामकारक वापर, महिलांना विकास प्रक्रीयेत महत्वाचे स्थान देणे या गोष्टी अनुसरून संस्था आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करते.ग्रामीण दुर्बल कुटुंबांचा स्थायी स्वरूपाचा विकास व्हावा, त्यांना रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध व्हाव्यात या बरोबरच पर्यावरणाची समृद्धी होऊन सामाजिक मुल्यांचे संवर्धन व्हावे यासाठी बाएफ डेव्हलमेन्ट रिसर्च फौंडेशन ही संस्था कार्यरत आहे.




लोकजागर

संस्था १९६७ मध्ये स्थापन झालेली आहे. गो-पैदास, शेती-वृक्ष-फळझाडे, पाणलोट क्षेत्रविकास, वनीकरण, महिला विकास, सामुहिक आरोग्य व आश्रम शाळांमध्ये जागृती अशा कार्यक्रमांच्या माध्यमांतून संस्था आज १३ राज्यामध्ये कार्यरत आहे.

बियाणे हा शेतीचा आत्मा आणि सर्वात महत्वाची निविष्ठा असून गेल्या हजारो पिढ्यापासून शेतकऱ्यांनी विविध पिकांच्या अनेक जाती निवडल्या, सुधारणा केल्या आणि त्याचा अन्न आणि पोषण सूरक्षा, आर्थिक उन्नती साठी वापर केला. परंतु सध्या सुरु असलेल्या एकांगी पद्धतीच्या पिक वाण सुधारणा कार्यक्रमामुळे अनेक पिक जातीमधील विविधता अत्यंत दुर्मिळ झाली आहे.

आता काही निवडक पिक जातींनी हजारो एकर जमीन व्यापून टाकली आहे; त्यामुळे ही जैवविविधता धोक्यात आली आहे. पिकामधील जनुकीय विविधता ही पिक वाण विविधता टिकवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.वातावरण बदलाच्या परिस्थितीत अन्न सुरक्षा, पोषण सुरक्षा हे संकट आपल्या समोर ठाकले आहे.

आजही विविध पिकांचे स्थानिक वाण त्यांच्या वैशिष्टपूर्ण गुणधमार्मुळे टिकून आहेत. आता गरज आहे ती अश्या वातावरण बदलात तग धरणाऱ्या, पोषण समृद्ध आणि रोग किडीस प्रतिकारक स्थानिक वाणांचा शोध घेऊन लोकसहभागातून संवर्धन आणि पुनरुजीवन करण्याची. बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फौंडेशन, पुणे मार्फत पिकांच्या स्थानिक वाणांचे आणि जंगली अन्न वनस्पतीचे संवर्धन आणि व्यवस्थापन कार्यक्रम पालघर जिल्ह्यातील जव्हार मध्ये २००९ मध्ये सुरु झाला ज्यामध्ये पिकांच्या स्थानिक वाणाबद्दलचे ज्ञानाचे संकलन, शास्त्रीय अभ्यास, बिजोत्पादन, मूल्यवर्धन आणि विक्री व्यवस्था हे मुख्य हेतू समोर ठेवले. त्यानंतर एप्रिल २०१४ पासून राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र शासन ह्यांच्या सहकार्याने महाराष्ट्र जनुक कोश कार्यक्रम, अंतर्गत जव्हार (पालघर), अकोले (अहमदनगर), जुन्नर (पुणे), धडगाव (नंदुरबार), एटापल्ली (गडचिरोली), कुडाळ (सिंधुदुर्ग) येथे सुरु झाला.सदर कार्यक्रमामध्ये भात, नाचणी, वरई, राळा, मोर-बंटी, वाल-घेवडा, मका, ज्वारी, चवळी, भाजीपाला पिके, कंद पिके, तेलबिया पिके तसेच जंगली भाज्या, जंगली फळे इत्यादीचे सर्वेक्षण, संवर्धन आणि उत्पादन असा कार्यक्रम हाती घेतला आहे. ■ ■

## मातीशी नाळ जोडणारा ॲग्रो टूरिझम व्यवसाय

कृषी पर्यटन म्हणजे तिथल्या मातीचा वास. तिथलं आभाळ, तिथली पिकं, पाणी, हवा, माती, माणसं, त्यांचे स्वभाव, समज, संस्कृती, घरं, बोली, गाणी, कविता, संगीत, खाणं, कपडे, त्यांचे रंग...

कृषी पर्यटन हा ग्रामीण तरुणाचा, शेती संस्कृतीत वाढलेल्या युवकाचा स्वतःच्या जीवनशैलीवरचा गाढ विश्वास आहे. हे काही प्रमाणात बेरोजगारीला उत्तर असेलही. पण तो नफा-तोट्याच्या गणितातला धंदा नव्हे. तुम्ही ग्रामीण संस्कृतीचे सच्चे दूत असाल तरच तुम्ही त्यासाठी आसुसलेल्या पर्यटकांना आकर्षित करू शकाल.

जुन्नरजवळ असलेलं मनोज हड-वळे यांचं पराशर कृषी पर्यटन हे याचं उत्तम उदाहरण आहे.

पराशर कृषी पर्यटन केंद्र जुन्नर तालुक्यात आहे. कल्याण-नगर रस्त्यावर आळे फाट्यापासून जवळ असलेल्या राजुरी गावात हे केंद्र वसवलं. शेतकीदृष्ट्या तालुका समृद्ध. तालुक्याचा ऐतिहासिक वारसा खूप मोठा. लेणी, मंदिरं ख्यातकीर्त. शिवाय मुंबई आणि पुण्याशी नाळ जोडलेली असल्याने आधुनिकतेच्या आणि उत्तम शिक्षणाच्या खुणा जागोजागी दिसतात.

बँकेतली स्थिर नोकरी सोडून आपल्याला कृषी पर्यटन क्षेत्रात काही तरी करायचंय, या ऊर्मीतून मनोजने इथे काम सुरू केलं. २०११ साली केंद्र सुरू झालं. गेल्या दहा वर्षांत सुमारे सात हजार पर्यटक इथे भेट देऊन गेले. त्यातील ५०० पर्यटक परदेशांतून आले होते. लक्षणीय म्हणजे ही संख्या वाढतेच आहे.

पराशर हे रिसॉर्ट नाही. हे हॉटेल नाही. सतत भटारखाना सुरू असायला इथे असे रेस्टॉरंट नाही. मद्यपान, धूम्रपान इथे निषिद्ध आहे. मांसाहारही मिळत नाही. टिपिकल रूम सर्व्हिस नाही. गेम्स नाहीत, स्विमिंग पूल नाही. सर्वसाधारण पर्यटनाच्या भाऊगर्दीत कृषी पर्यटनाला स्वतःची ओळख देण्यात महाराष्ट्रातील अनेक केंद्रं अग्रस्थानी असतील. पराशरमध्ये मनोज आपल्याबरोबर सामूहिक भोजनगृहात जेवतो आणि इथल्या अनेक कुटींपैकी एका कुटीत राहतो... थंडी खूप असली की शेकोटीपुढे रात्रीचं अंग शेकत बसायचं आणि सोबत भाकरी-कालवणाचं पोटभर जेवण रिचवायला गप्पा. मनोजच्या पोतडीत अनुभव खूप. शिवाय तो खूप प्रयोगशील आहे.

मनोज पर्यटन जगतो. तो पर्यटनाची पेरणी करतो, मळणी करतो, भाजणी करतो आणि पर्यटनाचीच कापणी करतो. त्याच्या ह्यपराशरह्यच्या खळ्यात पर्यटनाचंच पीक येतं! तो पर्यटन शेतकरी आहे. या कृषी पर्यटनात जीवन आणि अनुभव समृद्ध करणारं खरं पर्यटन घडतं का? या प्रश्नांचा शोध ज्याने-त्याने स्वतः घ्यायचाय आणि मनोजचा नव्हे यशस्वी उद्योजकाचा मार्ग अवलंबावा नाही का? ■ ■



शब्दार्थ
JNPT
जवाहरलाल नेहरू बंदर(जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी)) किंवा न्हावा शेवा हे आधुनिक सुविधा असलेले बंदर मुंबईच्या उत्तरेला ठाण्याच्या खाडीवर भारतातील सगळ्यात मोठे कंटेनर-बंदर आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## तोतया आयपीएस अधिकाऱ्याचा नबाबी थाट

■ वृत्तसंस्था, सातारा, दि. ८ :



शासकीय नोकरीच्या अमिषानेतरूणांची लाखो रूपयांची फसवणूक करणारा तोतया आयपीएस अधिकारी श्रीकांत विलास पवार याला बनावट आयकार्ड करून देणाऱ्या संशयिताला हैदराबादमधील बहादूरपुरा परिसरातून अटक करण्यात आली आहे. तो ई सेवा केंद्र चालक असून अवघ्या ५०० रूपयात त्याने बनावट आयकार्ड तयार करून दिल्याची माहिती आहे.

हैदराबामध्ये ई सेवा केंद्र चालवणारा अझिमुद्दीन नईमुद्दीन खान (रा. किशन बाग, बहादूरपूरा, हैदराबाद) याने ५०० रूपयात बनावट आयकार्ड तयार करून दिल्याची माहिती चौकशीत समोर आली. त्यानंतर कराड पोलिसांच्या पथकाने हैदराबादला जाऊन संशयिताला अटक केली. संशयिताला दोन दिवस पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. सध्या संशयित न्यायलयीन कोठडीत आहे.

दोन लाखांचा मोबाईल, हातात लाखाचं घड्याळ, पायात दहा हजाराचा शूज, ताज, ओबेरॉयसारख्या अलिशान हॉटेलात वास्तव्य, अशा रुबाबात तोतया आयपीएस अधिकारी वावरायचा. तसंच इनोव्हा कारमध्ये अंबर दिवा, इंग्रजी पुस्तकं, वर्दी, डायरी असायची.

आपण आयपीएस अधिकारी (इंटेलिजन्स ब्युरो) असल्याचं सांगून शासकीय नोकरीचं अमिष दाखवायचा. तरूणही त्याच्या नबाबी थाटाला भुलून नोकरीसाठी पैसे द्यायचे. त्या रकमेतून तो महागड्या हॉटिलमध्ये वास्तव्य करून नवाबी थाटात वावरायचा.

## डॉन अरुण गवळीला संचित रजा मंजूर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ८ :



अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २८ दिवसांची संचित रजा मंजूर केली आहे. न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांनी हा निर्णय दिला.

अरुण गवळी हा मुंबईतील शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसंडेकर यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. अरुण गवळीने संचित रजेसाठी कारागृह उपमहानिरीक्षकांकडे आपला अर्ज पाठवला होता. मात्र, हा अर्ज नाकारला होता. त्यावेळी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचे कारण देण्यात आले होते. या आदेशाविरुद्ध अरुण गवळीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावरील सुनावणीदरम्यान, गवळीचे वकील ॲड. मीर नगमान अली यांनी कारागृह उपमहानिरीक्षकांचा निर्णय अवैध असल्याचा दावा केला. न्यायालयाने गवळीची याचिका मंजूर करून त्याला रजा मंजूर केली.

# पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या

### आरोपी वाल्मीक कराडशी संबंध असल्याचा संशय

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ८ :

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणात मुख्य आरोपी असलेला वाल्मीक कराड सध्या बीड पोलिसांच्या ताब्यात आहे. मात्र आता याच बीड पोलिसातील कर्मचाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

या पोलिस कर्मचाऱ्याने आत्महत्या नेमकी का केली? त्याच्यावर कोणता दबा होता का? याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. या कर्मचाऱ्याने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल का उचलले? हा प्रश्न अनेकांना पडला आहे. आता पोलिस तपासात काय समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बीड जिल्हा हा सध्या महाराष्ट्रात चर्चेचा विषय ठरला आहे. बीड जिल्ह्यात राजकीय मंडळी यांनी पोलिस यांच्या माध्यमातून संघटित गुन्हेगारी होत असल्याचा आरोप राज्यभरातून नेते करत आहेत. यातच बीड जिल्ह्यातील वाल्मीक कराड हा पोलिसांच्या ताब्यात आहे. सीआयडी आणि पोलिस प्रशासनाच्या माध्यमातून वाल्मीक कराडची सध्या चौकशी सुरू आहे. तो बीड पोलिसांच्या ताब्यात आहे.

आता यात बीड पोलिसातील पोलिस कर्मचारी अनंत इंगळे यांनी आत्महत्या केली आहे. मात्र, त्यांची आत्महत्या आणि वाल्मीक कराड याचा काही संबंध आहे का? अशी चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये सुरू झाली आहे.

## सहकार भारतीच्या माजी अध्यक्षा डॉ. शशीताई अहिरे यांचे निधन

**नाशिक :** सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेशच्या माजी अध्यक्षा तसेच नाशिक जिल्हा रेणुका नगर नागरी सहकारी पतसंस्थेच्या संस्थापक अध्यक्ष असलेल्या डॉ. शशीताई अहिरे यांचे निधन झाले. गेल्या आठवडयापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. सहकार, दिव्यांग विद्यार्थी, महिला, अनाथ मुले अशा विविध क्षेत्रातील त्यांचे काम वाखाणण्याजोगे आहे.

नाशिक जिल्हा महिला सहकारी बँकेच्या अध्यक्ष असलेल्या डॉ.अहिरे यांची सहकार भारतीच्या प्रदेश अध्यक्षपदी आळंदी येथील अधिवेशनात २०२१ साली निवड झाली होती. सहकार भारतीचे राष्ट्रीय प्रचार प्रमुख भालचंद्र कुलकर्णी यांनी यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले होते.

## वाशी पोलिस ठाणे आवारात स्फोट



**वाशी :** येथील पोलिस ठाणे आवारात सकाळी ११ वाजता स्फोट झाल्याने मोठा आवाज व आसपासच्या घरे, दुकाने यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पोलिस ठाणे इमारत व लगतच पूर्वी पोलिसांच्या सदनिका असलेल्या भागात हा स्फोट झाला. मागील एक वर्षापूर्वी या ठिकाणी असलेल्या सदनिका पूर्णतः पाडण्यात आलेल्या आहेत. सर्वत्र मोकळी जागा आहे. या मोकळ्या जागेला लगतच पत्र्याचे शेड मध्ये दुकाने, पक्की घरे आहेत. स्फोट झालेल्या ठिकाणी मोठा खड्डा पडला आहे.

स्फोटाचा आवाज खूप मोठा असल्याने शेजारील मोबाईल दुकानातील स्क्रीन, ग्राहक सेवा केंद्रातील काचेचे टेबल इतर साहित्य हे तुटून बाजूला पडले आहेत. तर घरातील लाकडी दरवाजे तुटले आहेत. स्फोटाची तीव्रता मोठी असल्याने १ हजार मीटर पर्यंत नुकसान झाले आहे. पोलिस ठाण्याचे अंमलदार यांना बसण्यासाठी असलेल्या ठिकाणची काचे तुटून पडले आहेत. ग्राहक सेवा केंद्रात काम करणाऱ्या एक महिला कर्मचारी किरकोळ जखमी झाली आहे.

## जरांगेंवर बीडमध्ये १० गुन्हे दाखल

**छत्रपती संभाजीनगर :** सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ परभणी येथे आयोजित निषेध मोर्चात, मनोज जरांगे यांनी मंत्री धनंजय मुंडे आणि वंजारी समाजाबद्दल केलेल्या आक्षेपार्ह विधानाचे राज्यभर पडसाद उमटत आहेत. बीडमध्ये त्यांच्यावर १० तर हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातही त्यांच्यावर प्रत्येकी एक गुन्हा दाखल झाला आहे.

नांदेड जिल्ह्यातील माळाकोळी (ता. लोहा) पोलिस ठाण्यात जरांगेंवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने जरांगेंवर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील गोंदी पोलिस ठाण्यात ओबीसी समाजबांधवांनी निदर्शने केली होती.

## कॉल सेंटरमधील तरुणीची हत्या

**पुणे :** पुणे शहरात येरवडा भागातील कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या २८ वर्षीय तरुणीवर सहकाऱ्याने कोयत्याने वार करुन खून केल्याची घटना घडली. याप्रकरणी येरवडा पोलिसांनी हल्लेखोर तरुणाला रात्री अटक केली. आर्थिक वादातून हा हल्ला झाल्याची माहिती पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आली आहे. ही तरुणी खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात होती. उपचारादरम्यान रात्री मृत्यू झाला. हल्लेखोर कृष्णा सत्यनारायण कनोजा (३०) याला येरवडा पोलिसांनी रात्री उशिरा अटक केली.